प्रवचन

(भाग १)

ईमान

लेखक
सय्यद अबुल आला मौदूदी

अनुवादक
प्रा. मुबारक हुसेन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

मुस्लिम असण्यासाठी ज्ञानाची आवश्यकता

अल्लाहचे सर्वांत मोठे उपकार

बंधुनो! प्रत्येक मुस्लिम अंत:करणपूर्वक असे समजतो की जगात सर्वांत मोठी अल्लाहची देणगी म्हणजे इस्लाम होय. प्रत्येक मुस्लिम याबद्दल अल्लाहचे उपकार मानतो की त्याने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या उम्मत (अनुयायी समाज) मध्ये त्याला सामील केले आणि इस्लामची देणगी त्याला प्रदान केली. खुद्द सर्वश्रेष्ठ अल्लाहसुद्धा याला आपल्या दासांना त्याने प्रदान केलेली सर्वांत मोठी देणगी ठरवितो. त्या संबंधाने पवित्र कुरआनमध्ये सांगितले गेले आहे,

"आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे. आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे." *(कुरआन-५:३)*

कृतज्ञ वृत्तीची मागणी

हा उपकार अल्लाहने आपणावर केला आहे त्याचा हक्क अदा करणे आपले कर्तव्य आहे. कारण जो मनुष्य एखाद्याच्या उपकाराची परतफेड करीत नाही किंवा हक्क अदा करीत नाही तो कृतघ्न असतो. सर्वांत वाईट कृतघ्नता माणसाने ईश्वराच्या उपकाराच्या हक्काचे विस्मरण करावे, ही आहे.

आता तुम्ही विचाराल की ईश्वराच्या उपकाराचा हक्क कशा प्रकारे अदा केला जातो? मी उत्तरादाखल असे म्हणेन की अल्लाहने आपणास प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या उम्मत (अनुयायी समाज) मध्ये जन्म दिला आहे, तर या उपकाराची योग्य कृतज्ञता प्रेषित मुहम्मद (स.) यांचे पूर्णार्थाने अनुयायी बनणे ही आहे.

अल्लाहने तुम्हाला मुस्लिमांच्या मिल्लत (समाज) मध्ये सामील केले आहे, तर त्याच्या या मेहेरबानीचा हक्क अदा होऊ शकतो, पूर्णार्थाने मुस्लिम बनूनच! याशिवाय अल्लाहच्या या महान उपकाराचा हक्क कोणत्याही प्रकारे अदा होऊ शकत नाही. समजा जर तुम्ही हा हक्क अदा केला नाही तर

जितका मोठा अल्लाहचा उपकार तितकाच मोठा त्याच्या कृतघ्नतेचा प्रकोपसुद्धा असेल. अल्लाहने आम्हा सर्वांना त्या प्रकोपापासून वाचवावे. आमीन. (तथास्तु.)

मुस्लिम बनण्यासाठी पहिले पाऊल

यानंतर तुम्ही दुसरा प्रश्न कराल की मनुष्य सर्वार्थाने कशा प्रकारे मुस्लिम बनू शकतो? याच्या उत्तरासाठी खूप तपशीलाची आवश्यकता आहे आणि पुढील शुक्रवारच्या प्रवचनात याच्या एक एक भागाचे आपल्यापुढे पूर्ण स्पष्टीकरण केले जाईल. परंतु आजच्या प्रवचनात मी आपल्यासमोर त्या गोष्टीचे वर्णन करतो जी मुस्लिम बनण्यासाठी सर्वांत महत्त्वाची आहे. त्यास या मार्गातील प्रथम पाऊल समजले पाहिजे.

काय मुस्लिम एखाद्या वंशाचे नाव आहे?

बुद्धीला थोडे ताण देऊन विचार करा की तुम्ही 'मुस्लिम' शब्दाचा प्रयोग करता त्याचा अर्थ काय आहे? काय मनुष्य आईच्या पोटातूनच इस्लाम आपल्याबरोबर घेऊन येतो? काय एखादा मनुष्य केवळ यामुळेच मुस्लिम ठरतो की तो मुस्लिमाचा मुलगा व मुस्लिमाचा पौत्र आहे? काय मुस्लिम सुद्धा अशा प्रकारे मुस्लिम म्हणून जन्म घेतो ज्याप्रकारे एखाद्या ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मण म्हणून जन्म घेतो, एखाद्या राजपुताचा मुलगा राजपूंत आणि एका शूद्राचा मुलगा शूद्र? काय मुस्लिम एखाद्या वंश अथवा जाती अथवा भावकीचे नाव आहे, जसे एखादा इंग्रज, इंग्रजाच्या घरी जन्मल्यामुळे इंग्रज होतो आणि एखादा जाट हा जाट जातीत जन्मल्यामुळे जाट होतो, अशाच प्रकारे एखादा मुस्लिम केवळ या कारणाने मुस्लिम होतो की तो मुस्लिम नावाच्या जातीत जन्माला आला? हे प्रश्न मी तुम्हाला विचारीत आहे, त्यांची उत्तरे तुम्ही काय द्याल?

तुम्ही असेच म्हणाल ना की नाही साहेब! याला मुस्लिम म्हणत नसतात. मुस्लिम जातीमुळे मुस्लिम होत नसतो, तर इस्लामचा स्वीकार केल्याने तो मुस्लिम बनतो आणि त्याने इस्लामचा त्याग केला तर तो मुस्लिम राहत नाही. एखाद्या माणसाने मग तो ब्राह्मण असो अथवा राजपूत, इंग्रज असो किंवा जाट, पंजाबी असो की निग्रो, जेव्हा त्याने इस्लामचा स्वीकार केला तेव्हा त्याचा मुस्लिमांत समावेश होतो आणि दुसरा एक मनुष्य मुस्लिमाच्या घरात जन्मला आहे आणि त्याने इस्लामचा अवलंब करण्याचे

सोडून दिले तर तो मुस्लिमाच्या जमातीतून बाहेर टाकला जाईल, मग तो सय्यदचा मुलगा असो की पठाणचा.

सज्जनहो, तुम्ही माझ्या प्रश्नांची हीच उत्तरे द्याल ना? बरे तर आता खुद्द तुमच्याच उत्तरावरून कळते की अल्लाहची सर्वांत मोठी देणगी म्हणजे मुस्लिम असण्याची देणगी तुम्हाला मिळाली आहे ती काही अशी वांशिक गोष्ट नाही जी आई-वडिलांकडून वारसा म्हणून आपोआप तुम्हाला मिळते आणि आपोआपच तुम्हाला आयुष्यभर चिकटून राहणार आहे. मग तुम्ही त्याची पर्वा करा अथवा करू नका. ती तर अशी देणगी आहे ज्यास प्राप्त करण्यासाठी स्वत: प्रयत्न करणे आवश्यक आहेत. तुम्ही प्रयत्न करून ती प्राप्त केली तरच मिळेल आणि जर त्याची पर्वा केली नाही तर ती तुमच्याकडून हिरावूनसुद्धा घेतली जाऊ शकते.

इस्लाम स्वीकारण्याचा अर्थ

आता पुढे चला. आपण म्हणतो की इस्लाम स्वीकारल्यास मनुष्य मुस्लिम बनतो. प्रश्न असा आहे की इस्लाम स्वीकारण्याचा अर्थ काय आहे? काय इस्लाम स्वीकारण्याचा अर्थ असा आहे की माणसाने केवळ जिभेने सांगावे की मी मुस्लिम आहे अथवा मुस्लिम झालो आहे, तर काय तो मुस्लिम होतो? अथवा इस्लाम स्वीकारण्याचा अर्थ असा आहे की ज्याप्रमाणे एखादा ब्राह्मण पुजारी काहीही अर्थ न समजता उमजता संस्कृतच्या काही मंत्रांचे पठण करतो, तसेच एका मनुष्याने अरबी भाषेतील काही वाक्ये अर्थबोध न होता जिभेने उच्चारले आणि बस्स, तो मुस्लिम झाला? तुम्ही स्वत: सांगा की या प्रश्नाचे तुम्ही काय उत्तर द्याल? तुम्ही स्वत: म्हणाल की इस्लामचा स्वीकार करण्याचा अर्थ प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जी शिकवण दिली आहे तिचा माणसाने समजून उमजून मनापासून स्वीकार करावा आणि त्यानुसार कृती करावी. जो असे करील तो मुस्लिम आहे आणि जो असे करणार नाही तो मुस्लिम नाही.

प्रथम आवश्यकता - ज्ञान

जे उत्तर तुम्ही द्याल त्यावरून आपोआपच हे स्पष्ट होते की इस्लाम प्रथमत: ज्ञानाचे नाव आहे आणि ज्ञानानंतर कर्म अथवा कृतीचे नाव आहे. एखादा मनुष्य ज्ञानाशिवाय सुद्धा ब्राह्मण असू शकतो, कारण त्याचा जन्म

ब्राह्मण म्हणून झाला आहे आणि तो ब्राह्मणच राहील. एखादा मनुष्य ज्ञान नसतानाही जाट असू शकतो, कारण तो जाट म्हणून जन्मला आहे आणि तो जाटच राहील. परंतु एखादा मनुष्य ज्ञानाशिवाय मुस्लिम असू शकत नाही कारण मुस्लिम जन्मतः मुस्लिम असत नाही तर तो ज्ञानाने मुस्लिम बनतो. जोपर्यंत त्याला प्रेषित मुहम्मद (स.) यांनी कोणती शिकवण दिली आहे हे ज्ञान मिळत नाही, तोपर्यंत तो त्यावर ईमान धारण कसे करू शकेल? आणि त्यानुसार कसे कर्म करू शकेल? आणि जर त्याने समजून उमजून ईमान धारण केले नसेल तर तो कसा मुस्लिम होऊ शकेल? म्हणून अज्ञानासह मुस्लिम असणे आणि मुस्लिम म्हणून राहणे अशक्य आहे. प्रत्येक मनुष्य ज्याने मुस्लिमाच्या घरी जन्म घेतला आहे, ज्याचे नाव मुस्लिमासारखे आहे, जो मुस्लिमासारखे वस्त्र परिधान करतो आणि जो स्वतःला मुस्लिम म्हणवितो, वास्तविकतः तो मुस्लिम नाही. खऱ्या अर्थाने मुस्लिम तर केवळ तो मनुष्य आहे जो इस्लामचे ज्ञान बाळगतो आणि समजून उमजून त्याला मानतो. एक अनेकेश्वरवादी व एक मुस्लिमात मौलिक अंतर नावाचे नाही. तो रामप्रसाद आहे आणि हा अब्दुल्लाह आहे, म्हणून तो अनेकेश्वरवादी आहे आणि हा मुस्लिम. अशा प्रकारे एक अनेकेश्वरवादी व एका मुस्लिमात मौलिक फरक पोषाखाचासुद्धा नाही की तो धोतर नेसतो आणि हा विजार घालतो म्हणून तो अनेकेश्वरवादी आहे आणि हा मुस्लिम! तर मूळ फरक या दोहोंमध्ये ज्ञानाचा आहे. तो अनेकेश्वरवादी अशासाठी आहे की त्याला माहीत नाही की अल्लाहचा त्याच्याशी व त्याचा अल्लाहशी काय संबंध आहे? त्याला माहीत नाही की सृजनकर्त्याच्या इच्छेनुसार या जगात जीवन व्यतीत करण्याचा सरळ मार्ग कोणता आहे? अशीच स्थिती एखाद्या मुस्लिमाच्या मुलाची सुद्धा असेल, तर तुम्हीच सांगा की त्याच्यात आणि एक अनेकेश्वरवाद्यामध्ये कोणत्या आधारे फरक कराल आणि म्हणाल की तो अनेकेश्वरवादी आहे आणि हा मुस्लिम आहे?

बंधुनो! हे मी सांगत आहे ते लक्षपूर्वक ऐका आणि शांत मनाने यावर विचार करा. हे चांगल्याप्रकारे समजून घेतले पाहिजे की अल्लाहची ही सर्वांत मोठी देणगी आहे ज्यावर तुम्ही आभार व कृतज्ञता व्यक्त करता ती प्राप्त होणे अथवा प्राप्त न होणे, हे ज्ञानावर अवलंबून आहे. ज्ञान नसेल तर ही देणगी त्याला प्राप्तच होऊ शकत नाही. समजा थोडी बहुत प्राप्त सुद्धा झाली तर

अज्ञानामुळे सदैव ही भीती असते की ही वैभवशाली देणगी त्याच्या हातातून निसटून जाईल. केवळ अज्ञानामुळे तो स्वत:ला मुस्लिम समजत राहील, वास्तविकत: तो मुस्लिम नसेल. ज्या माणसाला ही जाणीवच नसेल की इस्लाम व अनेकेश्वरवादात काय फरक आहे आणि इस्लाम व बहुदेववादात काय अंतर आहे, त्याची स्थिती तर अगदी अशी आहे जणू एखादा मनुष्य अंधारात एखाद्या पायवाटेवरून चालत आहे. सरळ रेषेवर चालता चालता स्वत: त्याचे पाय एखाद्या अन्य मार्गाकडे वळणे शक्य आहे आणि त्याला सरळ मार्गावरून भटकल्याची कल्पनासुद्धा येत नाही. असे सुद्धा शक्य आहे की मार्गात एखादा धोकेबाज उभा असेल आणि त्याने म्हणावे की तुम्ही अंधारात मार्गावरून भटकला आहात, या मी तुम्हाला तुमच्या गंतव्यापर्यंत पोहचवितो. बिचारा अंधारातून प्रवास करणारा स्वत:च्या डोळ्याने पाहू शकत नाही की सरळ मार्ग कोणता आहे. म्हणून तो अज्ञानाने आपला हात त्या धोकेबाजाच्या हातात देईल आणि तो त्याला मार्गभ्रष्ट करून कोठल्या कोठे घेऊन जाईल. त्या माणसाला या अडचणी तर अशासाठी येतात की त्याच्या स्वत:जवळ कोणताही प्रकाश नाही आणि तो स्वत: आपल्या मार्गावरील खुणा पाहू शकत नाही. त्याच्याजवळ प्रकाश असता तर हे स्पष्ट आहे की तो मार्गही चुकला नसता आणि त्याला दुसरा कोणी मार्गभ्रष्टही करू शकला नसता. बस्स! याच्यावरूनच कल्पना करा की मुस्लिमासाठी सर्वांत मोठा जर कोणता धोका असेल तर हाच आहे की तो स्वत: इस्लामच्या शिकवणींपासून अनभिज्ञ आहे, स्वत:ला हे माहीत नाही की पवित्र कुरआन काय शिकवितो आणि प्रेषित मुहम्मद (स.) कोणता आदेश देऊन गेले आहेत? या अज्ञानामुळेच तो स्वत:ही मार्गभ्रष्ट होऊ शकतो आणि दुसरे धोकेबाज सुद्धा त्याला मार्गभ्रष्ट करू शकतील. परंतु त्याच्यापाशी ज्ञानाचा प्रकाश असेल तर तो जीवनाच्या प्रत्येक पावलावर इस्लामचा सरळ मार्ग पाहू शकेल, प्रत्येक पावलावर अनेकेश्वरवाद, बहुदेववाद, मार्गभ्रष्टता, दुष्कृत्य आणि दुराचाराचे जे वक्र-मार्ग मध्ये येतील ते ओळखून त्यांच्यापासून अलिप्त राहू शकेल, जो कोणी मार्गभ्रष्ट करणारा रस्त्यात त्याला आढळेल त्याचे ऐकूनच तो या निष्कर्षाप्रत पोहचेल की हा मनुष्य मार्गभ्रष्ट करणारा आहे, याचे अनुयायित्व स्वीकारणे चुकीचे आहे.

ज्ञानाचे महत्त्व

बंधुनो! हे ज्ञान ज्याच्या गरजेविषयी मी तुम्हाला सांगत आहे त्यावर तुमचे आणि तुमच्या संततीचे मुस्लिम असणे, मुस्लिम म्हणून राहणे अवलंबून आहे. ही काही हलकी गोष्ट नाही की त्यापासून निष्काळजी बनून राहावे. तुम्ही तुमच्या शेतीवाडीच्या कामात गाफील राहात नाही. तुमच्या शेतीला पाणी देणे आणि पिकाचे रक्षण करण्यातसुद्धा गाफील राहात नाही. जनावरांना चारा देण्यात गाफील राहात नाही. तुमच्या धंद्याच्या कामात गाफील राहात नाही; ते केवळ या कारणासाठी की त्यात गाफील राहाल तर उपाशी मराल आणि प्राणासारखी प्रिय गोष्ट व्यर्थ होईल. मग मला सांगा की ते ज्ञान प्राप्त करण्यात का गाफील राहाता ज्यावर तुमचे मुस्लिम बनणे आणि मुस्लिम राहणे अवलंबून आहे? काय यात हा धोका नाही की ईमानसारखी प्रिय गोष्ट नष्ट होईल? काय ईमान जिवापेक्षा अधिक प्रिय नाही? तुम्ही प्राणाचे रक्षण करण्यासाठी जितका वेळ व जितके श्रम खर्च करता तितका वेळ व त्या श्रमाचा दहावा भाग सुद्धा ईमानचे रक्षण करण्यासाठी खर्च करू शकत नाही का?

मी तुम्हाला असे सांगत नाही की तुमच्यापैकी प्रत्येकाने मौलवी (धर्मपंडित) बनावे, मोठमोठ्या ग्रंथांचे अध्ययन करावे आणि आपल्या आयुष्याची दहा-बारा वर्षे शिकण्यात खर्च करावीत. मुस्लिम बनण्यासाठी इतक्या शिक्षणाची गरज नाही. माझी केवळ इतकी अपेक्षा आहे की तुमच्यापैकी प्रत्येक व्यक्तीने रात्र व दिवसाच्या चोवीस तासांपैकी केवळ एक तास धार्मिक शिक्षण घेण्यासाठी खर्च करावा. कमीत कमी इतके ज्ञान प्रत्येक मुस्लिम मुलाला, म्हाताऱ्याला व तरुणाला प्राप्त झाले पाहिजे की पवित्र कुरआन ज्या उद्देशासाठी व जी शिकवण घेऊन अवतरित झाले आहे त्याच्या सारांशाचे ज्ञान त्याला व्हावे. प्रेषित मुहम्मद (स.) जे नष्ट करण्यासाठी व त्या जागी ज्याची स्थापना करण्यासाठी या जगात आले होते त्याविषयीची चांगली ओळख प्रत्येकाने करून घ्यावी. तसेच त्या विशिष्ट जीवनपद्धतीशी परिचित व्हावे जी अल्लाहने मुस्लिमासाठी ठरवून दिली आहे. इतक्या ज्ञानासाठी काही जास्त वेळेची गरज नाही आणि ईमान (धर्मावरील विश्वास) प्रिय असेल तर त्यासाठी दररोज एक तासाची वेळ काढणे काही कठीण नाही.

मुस्लिम व अनेकेश्वरवादीमधील मूळ फरक

मुस्लिम व अनेकेश्वरवादीमध्ये अंतर का?

माझ्या बंधुनो! प्रत्येक मुस्लिम स्वत: असे समजतो आणि तुम्हीसुद्धा असेच समजत असाल की मुस्लिमाचा दर्जा अनेकेश्वरवादीपेक्षा अधिक उच्च आहे. अल्लाहला मुस्लिम (आज्ञाकारी) प्रिय आहेत व अनेकेश्वरवादी (अवज्ञाकारी-काफिर) अप्रिय आहेत. मुस्लिमाला अल्लाहकडून क्षमा मिळेल व अनेकेश्वरवाद्यांना क्षमा मिळणार नाही. आज्ञाधारक स्वर्गामध्ये जाईल व अनेकेश्वरवादी नरकामध्ये जाईल. मला वाटते की आज तुम्ही यावर विचार करा की शेवटी मुस्लिम व अनेकेश्वादीमध्ये इतका मोठा फरक का आहे? अनेकेश्वरवादीसुद्धा प्रेषित आदम (अ.) यांची संतती आहे आणि तुम्हीसुद्धा. अनेकेश्वरवादीसुद्धा असाच मनुष्य आहे जसे तुम्ही आहात. त्याचेसुद्धा तुमच्याप्रमाणेच हात, पाय, डोळे, कान आहेत. तोसुद्धा याच हवेत श्वास घेतो. हेच पाणी पितो. याच पृथ्वीवर राहतो. हेच उत्पन्न खातो. अशा प्रकारे जन्म घेतो व अशाच प्रकारे मरतो. याच अल्लाहने त्यालासुद्धा निर्माण केले आहे ज्याने तुम्हाला निर्माण केले आहे. मग शेवटी त्याचा दर्जा का खालचा आहे आणि तुमचा उच्च? तुम्हाला जन्नत का मिळेल आणि त्याला जहन्नममध्ये का घातले जाईल?

केवळ नावाचा फरक आहे का?

हे विचार करण्यासारखे आहे. मनुष्यामनुष्यात इतका मोठा फरक केवळ इतक्या क्षुल्लक गोष्टीमुळे तर असू शकत नाही की तुम्हाला अब्दुल्लाह व अब्दुर्रहमान आणि अशाच अन्य नावाने बोलविले जाते आणि त्यांना दीनदयाळ व कर्तारसिंह आणि रॉबर्टसनसारख्या नावाने ओळखले जाते. अथवा तुम्ही खतना करवून घेता व तो करवून घेत नाही किंवा तुम्ही मांस भक्षण करता आणि तो ते खात नाही. अल्लाह ज्याने सर्व मानवांना निर्माण केले आहे आणि जो सर्वांचा पालनकर्ता आहे असा जुलूम तर कदापि करू शकत नाही की अशा लहान सहान गोष्टीवरून त्याने आपल्या निर्मितीत फरक करावा आणि एका दासाला जन्नत पाठवावे व दुसऱ्याला जहन्नममध्ये

पोहचवावे.

इस्लाम व अनेकेश्वरत्वातील मौलिक फरक

जर असे नाही तर मग विचार करा की दोहोंमध्ये मूळ फरक काय आहे? याचे उत्तर केवळ एक आहे आणि ते असे की दोहोंमध्ये फरक इस्लाम व अनेकेश्वरत्वामुळे पडतो. इस्लामचा अर्थ अल्लाहची आज्ञा पाळणे आहे. आणि अनेकेश्वरत्वाच अर्थ अल्लाहची अवज्ञा करणे आहे. मुस्लिम व अनेकेश्वरवादी (अल्लाहचा इन्कार करणारे) दोघे मनुष्य आहेत. दोघे अल्लाहचे दास आहेत. परंतु एक मनुष्य अशा कारणाने श्रेष्ठ बनतो की तो त्याच्या स्वामीला ओळखतो, त्याच्या आज्ञेचे पालन करतो आणि त्याच्या अवज्ञेच्या परिणामाचे भय बाळगतो. दुसरा मनुष्य उच्च स्थानावरून या कारणास्तव खाली कोसळतो की तो त्याच्या स्वामीला ओळखत नाही आणि त्याची अवज्ञा करतो. यामुळेच अल्लाह आज्ञाधारकांवर (मुस्लिमावर) प्रसन्न आहे व अनेकेश्वरवाद्यावर (अवज्ञाकारींवर) अप्रसन्न. तो आज्ञाधारकांना (मुस्लिमांना) जन्नत देण्याचा वायदा करतो आणि अनेकेश्वरवाद्यांना (अवज्ञाकारींना) म्हणतो की जहन्नममध्ये टाकीन.

फरकाचे कारण - ज्ञान व कर्म

यावरून असे कळते की आज्ञाधारकाला (मुस्लिमाला) अनेकेश्वरवादी (काफीर) पासून वेगळे करणारी मूळ कारणे हीच आहेत- एक ज्ञान व दुसरे कर्म. म्हणजे प्रथम तर त्याला हे जाणून घेतले पाहिजे की त्याचा स्वामी कोण आहे? त्याचे आदेश काय आहेत? त्याच्या इच्छेनुसार चालण्याचा अर्थ काय आहे? कोणते कर्म केल्याने तो प्रसन्न होतो व कोणत्या कर्मामुळे तो अप्रसन्न होतो? मग जेव्हा या गोष्टी त्याला कळल्या तेव्हा माणसाचे हे कर्तव्य ठरते की त्याने स्वतःला स्वामीचा दास बनवावे. जशी मालकाची इच्छा असेल त्याप्रमाणे वागावे आणि जी स्वतःची इच्छा असेल व मालकाची आज्ञा त्याच्या विरूद्ध असेल तर त्याने मनाचे म्हणणे ऐकू नये आणि स्वामीच्या आज्ञेचे पालन करावे. एखादे कर्म त्याला चांगले वाटत असेल आणि स्वामीने त्याला वाईट म्हटले तर त्याला वाईट समजावे. एखादे दुसरे कर्म त्याला वाईट वाटत असेल, परंतु स्वामीने सांगितले की ते चांगले आहे तर त्याला चांगलेच समजावे. एखाद्या कामात त्याला नुकसान दिसत असेल आणि

स्वामीची आज्ञा आहे की त्याने ते करावे तर ते त्याने केलेच पाहिजे. मग ते करण्यात त्याला प्राणार्पण करावे लागो अथवा कितीही सांपत्तिक हानी त्याला सोसावी लागो ते त्याने अवश्य करून दाखवावे. एखाद्या दुसऱ्या कामात त्याला लाभच लाभ दिसत असेल आणि स्वामीची आज्ञा आहे की ते त्याने करू नये तर मग जरी त्या कामात विपुल संपत्ती त्याला मिळत असेल तरी ते कार्य कदापि करू नये.

हेच ते ज्ञान व कर्म आहे ज्यामुळे मुस्लिम अल्लाहचा प्रिय दास बनतो व त्यावर अल्लाहचा कृपाप्रसाद अवतरित होतो आणि अल्लाह त्याला गौरव प्रदान करतो. अवज्ञाकारी- अनेकेश्वरवाद्याजवळ हे ज्ञान नसते, त्यामुळे त्याचे कर्मसुद्धा तसे नसते. म्हणून तो ईश्वराचा अज्ञानी व अवज्ञाकारी दास बनतो आणि ईश्वर त्याला आपल्या कृपाप्रसादापासून वंचित ठेवतो.

आता स्वत:च न्यायाची कास धरून विचार करा की जो मनुष्य स्वत:ला आज्ञाधारक (मुस्लिम) म्हणत असेल आणि तसाच अज्ञानी असेल जसा एक अनेकेश्वरवादी- अवज्ञाकारी (काफीर) असतो व तसाच अवज्ञाकारी असेल जसा एक अनेकेश्वरवादी असतो तर मग केवळ नाव, पोशाख आणि खाण्यापिण्याच्या फरकामुळे एखाद्या अनेकेश्वरवाद्याच्या- अवज्ञाकारींच्या तुलनेत तो कशा प्रकारे श्रेष्ठ ठरू शकेल? कोणत्या आधारे या जगात व पारलौकिक जीवनात अल्लाहच्या कृपाप्रसादाचा तो अधिकारी ठरू शकेल? इस्लाम कोणत्याही वंश किंवा घराणे अथवा जातीचे नाव नाही. इस्लाम पित्याकडून पुत्रास व पुत्राकडून पौत्रास आपोआप मिळत नाही. इस्लामला मान्य नाही की ब्राह्मणाचा मुलगा कितीही अज्ञानी असो आणि त्याने कितीही दुष्कृत्ये केली तरी तो उच्च कुलीनच राहील, कारण त्याने ब्राह्मणाच्या घरी जन्म घेतला आहे आणि उच्च जातीचा आहे. तसेच चांभाराचा मुलगा मग तो ज्ञान व कर्माच्या दृष्टीने सर्वप्रकारे श्रेष्ठ असला तरी तो नीचच राहील, कारण त्याने चांभाराच्या घरी जन्म घेतला आहे व नीच आहे. इस्लाममध्ये तर अल्लाहने आपल्या ग्रंथात (पवित्र कुरआनमध्ये) स्पष्ट सांगितले आहे,

“अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात जास्त ईशपरायण आहे.” *(कुरआन-४९:१३)*

प्रेषित इब्राहीम (अ.) एका मूर्तिपूजकाच्या घरी जन्मले. परंतु त्यांनी

अल्लाहला ओळखले आणि त्यांनी त्याच्या आज्ञेचे पालन केले म्हणून अल्लाहने त्यांना संपूर्ण जगाचा नेता बनविले. प्रेषित नूह (अ.) यांच्या मुलाने एका प्रेषिताच्या घरी जन्म घेतला, परंतु त्याने अल्लाहला ओळखले नाही आणि त्याची अवज्ञा केली. म्हणून अल्लाहने त्याच्या घराण्याचा विचार केला नाही आणि त्याच्यावर असा प्रकोप केला की ज्यापासून जगाने धडा घ्यावा. म्हणून चांगल्याप्रकारे समजून घ्या की अल्लाहच्या दृष्टीने माणसामाणसात काही फरक आहे तर तो ज्ञान व कर्मामुळे आहे. या जगात व पारलौकिक जीवनातसुद्धा त्याची कृपा केवळ त्याच लोकांसाठी आहे जे त्याला ओळखतात आणि त्याने दाखविलेल्या सरळमार्गाचे ज्ञान बाळगतात व त्याच्या आज्ञेचे पालन करतात. ज्या लोकांत हे गुण नसतील, मग त्यांची नावे अब्दुल्लाह आणि अब्दुर्रहमान असोत अथवा दीनदयाल आणि कर्तारसिंह; अल्लाहच्या दृष्टीने या दोघांत काहीही फरक नाही आणि त्याच्या कृपेतील काहीही हक्क त्यांना प्राप्त होत नाही.

मुस्लिमांच्या अधोगतीचे प्रमुख कारण

बंधुनो! तुम्ही स्वतःला मुस्लिम म्हणून संबोधता आणि तुमचा विश्वास आहे की अल्लाहची मुस्लिमावर कृपा असते. परंतु जरा डोळे उघडून पाहा की काय खरोखर अल्लाहची कृपा तुमच्यावर अवतरित होत आहे? पारलौकिक जीवनात जे काही घडेल ते तुम्ही नंतर पहालच, परंतु या जगात तुमची जी स्थिती आहे त्यावर दृष्टी टाका. या हिंदुस्थानात (लक्षात असावे की ही प्रवचने त्या काळात लिहिली गेली होती जेव्हा हिंदुस्तानची फाळणी झाली नव्हती.) तुमची संख्या नऊ कोटी आहे. तुमची इतकी मोठी संख्या आहे की जर एका एका व्यक्तीने एक एक खडा टाकला तर पर्वत बनेल, परंतु जेथे इतके मुस्लिम आहेत तेथे अनेकेश्वरवादी राज्य करीत आहेत. तुमच्या माना त्यांच्या मुठीत आहेत की तुम्हाला त्यांनी हवे तिकडे वळवावे. तुमचे मस्तक जे अल्लाहशिवाय कोणासमोर नमत नसे ते आता मनुष्यासमोर नमत आहे. तुमची ती प्रतिष्ठा मातीत मिसळून टाकली जात आहे. तुमचा हात जो सदैव उंच राहत असे आता तो खाली असतो आणि तो अनेकेश्वरवाद्यांसमोर पसरला जातो. अज्ञान, गरीबी व कर्जबाजारीने तुम्हाला सर्वत्र अपमानित व लज्जित करून सोडले आहे. काय हीच अल्लाहची कृपा आहे? ही कृपा नव्हे तर हा उघड प्रकोप आहे. हे किती आश्चर्य आहे की मुस्लिमावर अल्लाहचा प्रकोप व्हावा! मुस्लिम

आणि तो अपमानित व्हावा! मुस्लिम आणि तो गुलाम असावा! हे तर अशक्य कोटीचे आहे की एखादी वस्तु पांढरी शुभ्र आहे व काळीकुट्टही आहे. मुस्लिम अल्लाहला प्रिय असतो, मग अल्लाहचा प्रिय जगात तो कसा अपमानित व तुच्छ असू शकेल? काय तुमचा अल्लाह अत्याचारी आहे की तुम्ही तर त्याचा अधिकार ओळखावा, त्याच्या आज्ञेचे पालन करावे आणि त्याने अवज्ञा करणाऱ्यांना तुमच्यावर शासक बनवावे? आणि तुम्हाला मात्र आज्ञाधारकतेचा मोबदला म्हणून शिक्षा द्यावी? तुमचा विश्वास आहे की अल्लाह जुलूम करणारा नाही आणि तुमची खात्री आहे की अल्लाहच्या आज्ञापालनाचा मोबदला अपमान म्हणून मिळू शकत नाही. तर तुम्हाला हे स्वीकार करावे लागेल की मुस्लिम असण्याचा जो तुम्ही दावा करता त्यातच काहीतरी चूक आहे. सरकारी कागदपत्रात तर तुमच्या नावाची नोंद मुस्लिम म्हणून अवश्य केली जाते. परंतु अल्लाहच्या न्यायालयात इंग्रज सरकारच्या दफ्तराच्या सनदीवर निर्णय केला जात नाही. अल्लाह आपला वेगळाच दफ्तर ठेवतो. त्यात शोधा की तुमचे नाव आज्ञाधारकाच्या यादीत नोंदले आहे की अवज्ञाकारींच्या यादीत?

अल्लाहने तुमच्याकडे ग्रंथ पाठविला आहे जेणेकरून तुम्ही हा ग्रंथ वाचून आपल्या स्वामीस ओळखावे आणि त्याच्या आज्ञापालनाची पद्धत समजून घ्यावी. काय तुम्ही कधी हे समजून घेण्याचा प्रयत्न केला की या ग्रंथात काय लिहिले आहे? अल्लाहने आपल्या प्रेषितांना तुमच्याकडे पाठविले जेणेकरून त्यांनी तुम्हाला आज्ञाधारक (मुस्लिम) बनण्याची पद्धत शिकवावी. काय तुम्ही कधी हे माहीत करून घेण्याचा प्रयत्न केला की त्याच्या प्रेषितांनी काय शिकविले आहे? अल्लाहने तुम्हाला या जगात व पारलौकिक जीवनात प्रतिष्ठा प्राप्त करण्याची एक आदर्श जीवनपद्धत दाखविली. काय तुम्ही त्यावर चालता? ज्यांच्यामुळे मनुष्य या जगात व पारलौकिक जीवनात लज्जित होतो. काय तुम्ही अशा कामापासून अलिप्त राहता? सांगा, तुमच्यापाशी याचे काय उत्तर आहे? जर तुम्ही हे मान्य करता की तुम्ही अल्लाहचा ग्रंथ आणि त्याचे प्रेषित (मुहम्मद स.) यांच्या जीवनापासून कोणतेही ज्ञान प्राप्त केले नाही आणि त्यांनी दाखविलेल्या पद्धतीचे अनुसरणसुद्धा केले नाही, तर तुम्ही आज्ञाधारक (मुस्लिम) तरी कुठे झाला की तुम्हाला याचा चांगला मोबदला मिळेल? ज्या प्रकारचे तुम्ही आज्ञाधारक (मुस्लिम) आहात त्याच

प्रकारचा मोबदला तुम्हाला मिळत आहे आणि त्याच प्रकारचा मोबदला तुम्ही पारलौकिक जीवनात प्राप्त कराल.

यापूर्वी मी सांगितले आहे की मुस्लिम व अनेकश्वरवाद्यामध्ये केवळ ज्ञान व कर्माशिवाय अन्य कोणताही फरक नाही. एखाद्या माणसाचे ज्ञान व कर्म अनेकेश्वरवादीप्रमाणेच असेल आणि स्वत:ला तो मुस्लिम म्हणवितो तर तो साफ खोटे बोलत आहे. अनेकेश्वरवादी पवित्र कुरआनचे पठन करीत नाही आणि त्याला माहीत नसते की यात काय लिहिले आहे. हीच स्थिती जर मुस्लिमाची सुद्धा असेल तर त्याला काय म्हणून मुस्लिम म्हणावे? अनेकेश्वरवादीला जाणीव नसते की प्रेषित (मुहम्मद स.) यांची काय शिकवण आहे आणि त्यांनी ईश्वरापर्यंत पोहचण्याचा कोणता सरळ मार्ग दाखविला आहे. मुस्लिम सुद्धा त्याच्याप्रमाणे अज्ञानी असेल तर तो कसा मुस्लिम असू शकतो? अनेकेश्वरवादी ईश्वराच्या मर्जीप्रमाणे चालण्याऐवजी स्वत:च्या मर्जीप्रमाणे चालतो. मुस्लिम सुद्धा त्याच्या व आपल्या मताप्रमाणेच चालणारा असेल, त्याच्याप्रमाणेच अल्लाहकडून बेपर्वा व आपल्या इच्छेचा गुलाम असेल तर त्याला स्वत:ला मुस्लिम (अल्लाहचा आज्ञाधारक) म्हणण्याचा काय अधिकार आहे? अनेकेश्वरवादी हलाल (धर्मसंमत) व हराम (धर्मनिषिद्ध) मध्ये फरक करीत नाही आणि ज्या कामात स्वत:ला फायदा व गोडी वाटेल त्याचा अवलंब करतो, मग अल्लाहच्या दृष्टीने ते हलाल असो की हराम. आणि असाच व्यवहार मुस्लिमाचा सुद्धा असेल तर त्याच्यात व अनेकेश्वरवाद्यामध्ये फरक तो कोणता? याचा अर्थ असा की मुस्लिम सुद्धा इस्लामच्या ज्ञानापासून तितकाच कोरा असेल जितका की अनेकेश्वरवादी असतो, आणि मुस्लिम सुद्धा ते सर्वकाही करतो जे अनेकेश्ववादी करतो तर त्याला अनेकेश्वरवाद्याच्या तुलनेत श्रेष्ठत्व का प्राप्त व्हावे? अंतिमदिनी त्याचा निवाडा अनेकेश्वरवाद्याप्रमाणेच का केला जाऊ नये? ही गोष्ट अशी आहे की जिचा विचार शांत मनाने आम्ही सर्वांनी केला पाहिजे.

चिंताजनक बाब

माझ्या प्रिय बंधुनो! आपण कदाचित असे समजू नये की मी मुस्लिमांना अनेकेश्वरवादी (काफीर) ठरवू इच्छितो. असे नव्हे. माझा हा हेतु कदापि नाही. मी स्वत:देखील विचार करतो आणि असे इच्छितो की आमच्यापैकी प्रत्येक व्यक्तीने स्वत: विचार करावा की शेवटी असे काय घडले आहे की आम्ही अल्लाहच्या कृपेपासून वंचित राहिलो आहोत? आमच्यावर चोहीकडून संकटे का येत आहेत? ज्यांना आम्ही अनेकेश्वरवादी अर्थात अल्लाहची अवज्ञा करणारे दास म्हणतो त्यांचे सर्वत्र आमच्यावर प्रभुत्व आहे. याचे कारण काय? आणि आम्ही जे अल्लाहचे आज्ञाधारक (मुस्लिम) असल्याचा दावा करतो ते सर्वत्र प्रभावहीन होण्याचे कारण काय? याच्या कारणासंबंधी जितका जास्त मी विचार केला तितका मला विश्वास होत गेला की आमच्यात व अनेकेश्वरवादीमध्ये केवळ नावाचा फरक उरला आहे. नाहीतर आम्ही सुद्धा अल्लाहकडून बेपर्वा व त्याच्यापासून निर्भय आणि त्याची अवज्ञा करण्यात त्यांच्यापेक्षा काही पाठीमागे नाही. आमच्यात व त्यांच्यात थोडा फरक अवश्य आहे. परंतु यामुळे आम्ही कोणत्याही चांगल्या मोबदल्यास पात्र ठरत नाही तर उलट शिक्षेस पात्र ठरतो. कारण आम्हास माहीत आहे की पवित्र कुरआन अल्लाहचा ग्रंथ आहे आणि असे असूनदेखील त्याला आम्ही अशी वागणूक देतो जसा एक अनेकेश्वरवादी (इन्कार करणारा) देतो. आम्हाला माहीत आहे की प्रेषित मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत. असे असून देखील आम्ही त्यांच्या अनुयायित्वापासून असे पलायन करतो जसा एखादा अनेकेश्वरवादी करतो. आम्हाला याची जाणीव आहे की खोटारड्याला अल्लाहने धिक्कारले आहे, लाच खाणाऱ्याला व देणाऱ्याला नरकवास निश्चित ठरविले आहे. व्याज खाणाऱ्याला व देणाऱ्याला घोरतम अपराधी ठरविले आहे. निंदा करण्यास आपल्या स्वत:च्या बावाचे मांस भक्षण करण्यासारखे पाप ठरविले आहे. अश्लीलता, निर्लज्जपणा व व्यभिचाराच्या कृत्यावर भयंकर प्रकोपाची धमकी दिलेली आहे. परंतु या सर्व गोष्टी माहीत असूनदेखील आम्ही ही सर्व कृत्ये स्वैरपणे करतो, जणू आम्हाला अल्लाहचे अजिबात भय नाही. हेच कारण आहे की आम्ही अनेकेश्वरवाद्यांच्या तुलनेत थोडेफार मुस्लिम म्हणून आहोत असे दिसते. त्याबद्दल आम्हाला बक्षीस मिळत नाही तर उलट शिक्षा दिली जाते. अनेकेश्वरवाद्यांचे आमच्यावर अधिपत्य असणे व सर्वत्र पराभव पत्करणे

याच अपराधाची शिक्षा आहे की आम्हाला इस्लामची देणगी दिली गेली होती आणि असे असूनदेखील आम्ही त्याची कदर केली नाही.

प्रियजनहो, आजच्या प्रवचनात जे काही मी सांगितले आहे ते या उद्देशाने नव्हे की मी तुमची निंदा करावी. निंदा करण्याचा माझा हेतु नाही. माझा उद्देश असा आहे की जे काही आम्ही हरविले आहे ते परत प्राप्त करण्याची आम्ही चिंता करावी. हरविलेली वस्तु परत मिळविण्याची चिंता माणसाला त्याच वेळी होते जेव्हा त्याला माहीत असते की कोणती वस्तु त्याने हरविली आहे आणि ती किती मौल्यवान होती. म्हणूनच मी तुम्हाला सावध करण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्ही शुद्धीवर आला आणि जर तुम्हाला कळले की खरोखर बहुमूल्य वस्तु तुमच्याजवळ होती तर तुम्ही ती परत मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न कराल.

ज्ञान-लोभ

मी मागील प्रवचनात सांगितले होते की मुस्लिमास मुस्लिम असण्यास सर्वप्रथम ज्याची आवश्यकता आहे ते म्हणजे इस्लामचे ज्ञान. प्रत्येक मुस्लिमाला हे माहीत असणे आवश्यक आहे की पवित्र कुरआनची शिकवण काय आहे? प्रेषित मुहम्मद (स.) यांची पद्धत काय आहे? इस्लाम कशाला म्हणतात आणि अनेकेश्वरवाद व इस्लाममध्ये मौलिक फरक कोणत्या गोष्टीमुळे आहे? याचे ज्ञान असल्याशिवाय कोणतीही व्यक्ती मुस्लिम असू शकत नाही. परंतु खेदाची गोष्ट अशी की आम्हाला सत्य ज्ञानप्राप्तीची चिंता राहिली नाही, तसेच आम्हाला या गोष्टीची जाणीव नाही की आम्ही केवढ्या मोठ्या देणगीपासून वंचित राहिलो आहोत. माझ्या बंधुनो, आईसुद्धा आपल्या बाळाला तोपर्यंत दूध पाजत नाही जोपर्यंत ते रडून त्याची मागणी करीत नाही. तहानलेल्यास जेव्हा तहान लागते तेव्हा तो स्वतः पाण्याचा शोध करतो. अल्लाह त्याच्यासाठी पाणी उपलब्ध करतो. तुम्हाला स्वतःलाच तहान नसेल तर पाण्याने भरलेली विहीर जरी तुमच्याजवळ आली तरी व्यर्थ आहे. प्रथमतः तुम्हाला स्वतःला कळले पाहिजे की धर्मापासून अनभिज्ञ राहणे तुमच्यासाठी किती हानिकारक आहे. अल्लाहचा ग्रंथ तुमच्यापाशी आहे परंतु तुम्हाला कल्पना नाही की त्यात काय लिहिले आहे. याच्यापेक्षा अधिक हानिकारक अन्य कोणती गोष्ट असू शकेल? तुम्ही नमाज अदा करता, परंतु

तुम्हाला कळत नाही की या नमाजमध्ये तुम्ही आपल्या ईश्वरापुढे काय विनवणी करता. यापेक्षा मोठे नुकसान काय असू शकेल? ज्या कलम्याच्याद्वारे (पवित्र वचन) तुमचा प्रवेश इस्लाममध्ये होतो त्याचा अर्थदेखील तुम्हाला माहीत नाही आणि तुम्हाला याची देखील कल्पना नाही की या कलम्याचे (कलमा म्हणजे इस्लाम स्वीकारण्याचे वचन) पठन केल्याने तुमच्यावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या येतात. काय एखाद्या मुस्लिमाच्या दृष्टीने याच्यापेक्षाही एखादी मोठी हानी असू शकते? शेती वाळून गेल्याने होणाऱ्या हानीची तुम्हाला कल्पना आहे. रोजगार न मिळाल्याने होणाऱ्या नुकसानीची तुम्हाला कल्पना आहे, तुमच्या स्वतःचा व्यापारी माल नष्ट होण्याच्या नुकसानीची तुम्हाला कल्पना आहे. परंतु इस्लामचे ज्ञान नसल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची तुम्हाला कल्पना नाही. जेव्हा तुम्हाला या हानीची जाणीव होईल तेव्हा तुम्ही स्वतः येऊन म्हणाल की आम्हाला या हानीपासून वाचवा. जेव्हा तुम्ही असे सांगाल तेव्हा तुम्हाला या नुकासनीपासून वाचविण्याची देखील व्यवस्था होईल.

चिंताजनक बाब

पवित्र कुरआनशी आमचा व्यवहार

बंधुनो, सध्या या जगात केवळ मुस्लिमच ते भाग्यवान आहेत ज्यांच्याजवळ अल्लाहची वाणी अगदी सुरक्षित, सर्व प्रकारच्या फेरफारापासून मुक्त, अगदी त्याच शब्दांत उपस्थित आहे ज्या शब्दांत ती अल्लाहचे अंतिम प्रेषित (मुहम्मद स.) यांच्यावर उतरली होती. असे असूनदेखील या वेळी जगात मुस्लिमच ते दुर्दैवी लोक आहेत जे स्वत:जवळ अल्लाहची वाणी बाळगतात आणि तरीसुद्धा तिच्या समृद्धी व असीम आणि असंख्य देणग्यांपासून वंचित आहेत. पवित्र कुरआन त्यांच्याकडे अशासाठी पाठविला गेला होता की त्याचे पठन करावे, समजून घ्यावे, त्यानुसार कृती करावी आणि त्याच्या आधारे अल्लाहच्या पृथ्वीवर अल्लाहच्या कायद्यानुसार राज्य स्थापित केले जावे. तो त्यांना सन्मान व शक्ती प्रदान करण्यासाठी आला होता. तो त्यांना पृथ्वीवर अल्लाहचा उत्तराधिकारी बनविण्यासाठी आला होता. इतिहास साक्ष आहे की जेव्हा त्यांनी त्याच्या आदेशानुसार कृती केली तेव्हा त्याने त्यांना जगाचा मार्गदर्शक व प्रमुख सुद्धा बनवून दाखविले. परंतु आता त्यांच्या दृष्टीने कुरआनची उपयुक्तता याशिवाय काही उरली नाही की घरात त्याला ठेवून भूत-पिशाच्यांना पळवून लावावे, त्याच्या आयती लिहून गळ्यात बांधाव्यात आणि घोळून प्यावे आणि केवळ पुण्यप्राप्तीसाठी काहीही आकलन न होता त्याचे पठन केले जावे.

आता हे कुरआनकडे आपल्या जीवनाच्या प्रश्नावर मार्गदर्शनाची याचना करीत नाहीत. त्याच्याकडे विचारणा करीत नाहीत की, आमच्या श्रद्धा काय असाव्यात? आमची कर्मे काय असावीत? आमची चारित्र्ये कशी असावीत? आम्ही देवाण-घेवाण कशाप्रकारे करावी? मैत्री व शत्रुत्वात कोणत्या नियमांचे पालन करावे? अल्लाहच्या दासांचे व आमच्या स्वत:चे आमच्यावर कोणते हक्क आहेत व आम्ही ते कोणत्या प्रकारे द्यावेत? आमच्यासाठी सत्य काय आहे व असत्य काय? आम्हाला कोणाच्या आज्ञेचे पालन करावयास हवे आणि कोणाची अवज्ञा? कोणाशी संबंध ठेवावा आणि कोणाशी ठेवू नये? आमचा कोण मित्र व कोण शत्रु? आमचा विचार करता

आमची प्रतिष्ठा, कल्याण व लाभ कोणत्या गोष्टीत आहे आणि अपमान व अपयश कोणत्या गोष्टीत आहे?

या सर्व गोष्टींची विचारणा पवित्र कुरआनकडे करण्याचे मुस्लिमांनी सोडून दिले आहे. आता हे नास्तिक व अनेकेश्वरवाद्याना, मार्गभ्रष्ट व स्वार्थी लोकांना व स्वत: आपल्या मनातील शैतानाला या गोष्टी विचारतात आणि त्यांच्याच म्हणण्यानुसार वागतात. म्हणून अल्लाहला सोडून दुसऱ्यांच्या आज्ञेप्रमाणे वागण्याचे जे परिणाम व्हावयास हवे होते तेच झाले. आणि तेच परिणाम आज हे हिंदुस्तानमध्ये, चीन व जावामध्ये, पलेस्टाईन व सीरियात, अल्जीरिया व मोरोक्कोमध्ये, सर्व ठिकाणी अत्यंत वाईटप्रकारे भोगत आहेत.

पवित्र कुरआन तर मांगल्याचा स्रोत आहे. जितक्या व जशा मांगल्याची मागणी तुम्ही त्याच्याकडून कराल हा तुम्हाला देईल. तुम्ही याच्याकडे केवळ भूत पिशाच्चांना पळविणे व खोकला आणि तापाचा इलाज व खटल्यात यश व नोकरीची प्राप्ती आणि अशाच प्रकारच्या तुच्छ व हलक्या गोष्टींची मागणी कराल तर त्याच तुम्हाला मिळतील. जगातील बादशाही व पृथ्वीतलाच्या राज्याची मागणी कराल तर तीसुद्धा तुम्हाला प्राप्त होईल, आणि तुमची सर्वांत उंच आठव्या स्वर्गापर्यंत पोहचण्याची मनोकामना असेल तर हा तुम्हाला तेथपर्यंतसुद्धा पोहचवील. ही तर तुमच्या बुद्धीची दिवाळखोरी आहे की तुम्ही समुद्राकडे दोन थेंबांची मागणी करता, नाहीतर समुद्र तुम्हाला नदीच प्रदान करण्यास तयार आहे.

सज्जनहो, आमचे मुस्लिम बंधु हसून हसून अल्लाहच्या पवित्र ग्रंथावर जे अत्याचार करत आहेत ते इतके निंदनीय आहेत की स्वत: यानीच जर एखाद्या व्यक्तीला असले चाळे करताना पाहिले तर त्याची टिंगल उडवतील. एवढेच नव्हे तर त्याला वेडा ठरवतील.

तुम्हीच सांगा, एखाद्या माणसाने 'प्रिस्क्रीप्शन' औषधाची चिठ्ठी डॉक्टरकडून लिहून आणली आणि चिठ्ठीला कापडात गुंडाळून स्वत:च्या गळ्यात बांधले अथवा ती चिठ्ठी पाण्यात कोळून प्याला तर तुम्ही त्याला काय म्हणाल? तुम्हाला त्याच्या कृत्यावर हसू येईल की नाही? आणि तुम्ही त्याला मूर्ख समजणार नाही का? परंतु सर्वांत महान डॉक्टराने तुमच्या रोगावर उपचार व कृपेचे जे अनुपम 'प्रिस्क्रीप्शन' (औषध योजना) लिहून दिले आहे, त्याच्याशी

तुमच्या डोळ्यांदेखत असा दुर्व्यवहार होत आहे! आणि कोणालाही त्याची खंत नाही? कोणीही विचार करीत नाही की औषध-योजनेची चिठ्ठी गळ्यात अडकविण्याची अथवा कोळून पिण्याची वस्तु नव्हे, तर ती अशासाठी असते की तिच्यात दिलेल्या सूचनेनुसार औषधाचा प्रयोग केला जावा.

पवित्र कुरआनचे ज्ञान व कुरआननुसार व्यवहार आवश्यक

आता तुम्हीच सांगा, एखाद्या रोग्याने वैद्यकशास्त्राचा ग्रंथ घेतला व वाचत बसला आणि अशी कल्पना केली की केवळ या ग्रंथाचे वाचन केल्याने माझा रोग दूर होईल तर तुम्ही त्याला काय म्हणाल? तुम्ही असे म्हणणार नाही का की पाठवा याला मनोरुग्णालयात! याचे डोके फिरले आहे. परंतु पूर्णत: रोगमुक्त करणाऱ्या अल्लाहने जो ग्रंथ तुमच्या रोगांच्या उपचारासाठी पाठविला आहे. त्याच्याशी तुमचा असाच व्यवहार आहे! तुम्ही याचे पठन करता आणि अशी कल्पना करता की केवळ याच्या पठनाने सर्व रोगराई दूर होईल? याच्या मार्गदर्शनाची अंमलबजावणी करण्याची गरज नाही? आणि त्या गोष्टीचेही पथ्य पाळण्याची गरज नाही ज्यांना हा ग्रंथ अपमानकारक ठरवितो? मग जी गोष्ट तुम्ही त्या माणसाला लागू करता की जो केवळ वैद्यकीय ग्रंथाचे पठन रोग दूर करण्यासाठी पुरेसे मानतो तीच गोष्ट तुम्ही स्वत:वर का लागू करीत नाही?

एखादे पत्र अशा भाषेत आले की जी तुम्हाला येत नाही तर तुम्ही त्या भाषेच्या जाणकाराकडे पत्राचा मजकूर समजून घेण्यासाठी धाव घेता. जोपर्यंत तुम्हाला पत्राचा मजकूर काय आहे हे कळत नाही तोपर्यंत तुम्ही स्वस्थ बसत नाही. ही तुमची अस्वस्थता ह्या साध्या व्यवहाराच्या पत्रातील मजकुराबद्दल आहे की ज्यात तुम्हाला चार पैशांचा लाभ होणार आहे. परंतु संपूर्ण जगाच्या पालनकर्त्या अल्लाहकडून जे पत्र तुमच्याकडे आले आहे आणि ज्यात तुमच्यासाठी या जगातील आणि पारलौकिक जीवनातीचे सर्व लाभ आहेत ते पत्र मात्र तुम्ही स्वत:जवळ तसेच ठेवून देता. त्याचा मजकूर समजून घेण्यासाठी तुमच्या मनात कसलीही अस्वस्थता उत्पन्न होत नाही, काय ही कुतुहल व आश्चर्याची गोष्ट नव्हे?

अल्लाहच्या ग्रंथावरील अत्याचाराचा परिणाम

मी हे हास्य उपहासासाठी सांगत नाही. आपण यावर विचार केला तर आपले मन साक्ष देईल की जगात सर्वात जास्त अत्याचार अल्लाहच्या या पवित्र ग्रंथावर होत आहे. आणि हा अत्याचार करणारे तेच लोक आहेत जे म्हणतात की आमचा या पवित्र ग्रंथावर ईमान (विश्वास) आहे आणि म्हणतात की यासाठी प्राण देण्यास आम्ही तयार आहोत. निस्संशय ते याच्यावर ईमान ठेवतात आणि त्याला प्राणापेक्षा अधिक प्रिय मानतात. परंतु खेदाची गोष्ट अशी आहे की तेच याच्यावर सर्वांत अधिक जुलूम करीत आहेत आणि अल्लाहच्या ग्रंथावर जुलूम करण्याचा जो परिणाम आहे तो सूर्यप्रकाशासारखा स्पष्ट आहे. हे चांगल्याप्रकारे समजून असा की अल्लाहची वाणी (ग्रंथ) मानवाकडे अशासाठी येत नाही की ते दुर्दैव, अवहेलना व संकटात गुरफटून राहावे.

"हा (ग्रंथ) कल्याण व सौभाग्याचा स्रोत आहे. हा कठोरता व दुर्दैवाचे साधन नव्हे."

हे कदापि शक्य नाही की एखादा समाज अल्लाहची वाणी धारण करणारा आहे आणि त्याने जगात लज्जित व अपमानित राहावे, तो दुसऱ्यांचा गुलाम असावा, तो पददलित असावा व त्याला बुटाने ठोकरले जावे. त्याच्या गळ्यात गुलामीचा फास असावा आणि दुसऱ्यांच्या हाती त्याची लगाम असावी व त्यांनी त्याला अशाप्रकारे हाकावे जसे जनावरांना हाकले जाते. त्याची अशी दुर्दशा आपल्या नजरेसमोर आहे. त्यांच्याकडे तौरात (प्रेषित मूसा (अ.) यांच्यावर उतरलेला ग्रंथ) व इंजील (प्रेषित ईसा-येशू (अ.) यांच्यावर उतरलेला ग्रंथ) पाठविले गेले होते आणि म्हटले होते,

"किती छान झाले असते जर यांनी तौरात व इंजील आणि त्या दुसऱ्या ग्रंथांना रूढ केले असते जे यांच्या पालनकर्त्याकडून यांच्याजवळ पाठविले गेले होते. असे केले असते तर यांच्यासाठी वरून अन्नवृष्टी झाली असती व खालून जमिनीतून अमाप भेटले असते." *(कुरआन-५:६६)*

परंतु त्यांनी अल्लाहच्या या पुस्तकावर जुलूम केला आणि त्याचा परिणाम असा घडला,

"त्यांच्यावर अपमान, अधोगती व दुर्दशा ओढवली. आणि ते अल्लाहच्या

कोपाने वेढले गेले. हा परिणाम यामुळेच झाला की, अल्लाहच्या आयतींशी ते द्रोह करू लागले. आणि प्रेषितांची नाहक हत्या करू लागले. हे ह्यामुळेच घडले कि त्यांनी अवज्ञा केली आणि शरिअत कायद्याचे वारंवार उल्लंघन केले." (कुरआन-२:६१)

म्हणून ज्या लोकसमूहाजवळ अल्लाहचा ग्रंथ असेल आणि तरीसुद्धा तो पददलित व अपमानित आणि गुलाम व प्रभावित असेल तर असे समजा की तो अवश्य अल्लाहच्या ग्रंथावर जुलूम करीत आहे. त्याच्यावरील हा सर्व प्रकोप त्याच जुलुमामुळे आहे. अल्लाहच्या या प्रकोपापासून मुक्ती प्राप्त करण्याचा याशिवाय अन्य कोणताही मार्ग नाही, की त्याच्या ग्रंथावर जुलूम करावयाचे सोडून दिले जावे आणि त्याचा हक्क अदा करण्याचा प्रयत्न केला जावा. तुम्ही गावोगावी महाविद्यालये उघडली आणि तुमची सर्व मुले पदवीधर झाली व तुम्ही यहुदी (ज्यू) लोकांप्रमाणे व्याज खाऊन कोट्यधीश जरी बनला तरी तुमच्या स्थितीत कदापि परिवर्तन येणार नाही जोपर्यंत तुम्ही या महापापापासून परावृत्त होत नाही.

मुस्लिम कोणास म्हणतात?

बंधुनो! प्रत्येक मुस्लिमास सर्वप्रथम मुस्लिम कोणास म्हणतात हे कळले पाहिजे. तसेच 'मुस्लिम'चा अर्थ काय आहे? माणसाला हे माहीत नसेल की 'माणुसकी' म्हणजे काय आणि मनुष्य व जनावरात काय फरक आहे, तर तो जनावराप्रमाणे कृती करू लागेल आणि मनुष्य असण्याची किंमत त्याला वाटणार नाही. अशाच प्रकारे जर एखाद्याला हे माहीत नसेल की मुस्लिम असण्याचा अर्थ काय आहे आणि मुस्लिम व मुस्लिमेतरामध्ये कशा प्रकारे फरक पडतो तर तो मुस्लिमेतराप्रमाणे कृती करील आणि मुस्लिम असण्याची तो कदर करू शकणार नाही. म्हणून मुस्लिमाला व मुस्लिमाच्या मुलाला या गोष्टीचे ज्ञान असले पाहिजे की तो जो स्वतःला मुस्लिम म्हणवितो तर त्याचा अर्थ काय आहे आणि मुस्लिम झाल्याने माणसाच्या स्थितीत कोणता फरक पडतो, त्याच्यावर कोणत्या जबाबदाऱ्या येतात आणि इस्लामच्या त्या कोणत्या सीमा आहेत की ज्यांच्या आत राहून मनुष्य मुस्लिम राहतो व ज्यांच्या बाहेर पाऊल टाकल्याबरोबर तो मुस्लिमपणातून बाहेर पडतो, मग तो जिभेने स्वतःला मुस्लिम का म्हणेना!

इस्लामचा अर्थ

'इस्लाम'चा अर्थ आहे अल्लाहची अधीनता व आज्ञाधारकता, स्वत:ला अल्लाहच्या हवाली करणे. अल्लाहसमोर स्वत:च्या स्वातंत्र्य व स्वायत्ततेला तिलांजली देणे म्हणजे इस्लाम होय. अल्लाहच्या बादशाही व सत्तेसमोर मान तुकविणे इस्लाम होय. जो मनुष्य स्वत:च्या सर्व बाबी अल्लाहच्या हवाली करतो तो मुस्लिम होय आणि जो त्याच्या बाबी अथवा मामले स्वत:च्याच हातात ठेवतो अथंवा अल्लाहला सोडून इतर कोणाच्या हवाली करतो तो मुस्लिम नव्हे.

अल्लाहच्या हवाली करण्याचा अर्थ असा आहे की अल्लाहने कुरआनमध्ये व त्याच्या प्रेषितांकडून जे आदेश पाठविले आहेत ते मान्य करावेत, त्यात कां-कूं करू नये. जीवनात जो प्रश्न उभा राहील त्यात केवळ पवित्र कुरआन व प्रेषित (मुहम्मद स.) यांनी केलेल्या कृत्यांना मार्गदर्शक समजून त्यांचे अनुसरण केले जावे. जो मनुष्य स्वत:ची बुद्धी व जगाच्या प्रथा आणि ्ल्लाहशिवाय प्रत्येकाच्या कथनाला पाठीमागे टाकतो आणि प्रत्येक बाबीत अल्लाहच्या ग्रंथाला वा त्याच्या प्रेषित (मुहम्मद स.) यांना विचारतो की मी काय केले पाहिजे आणि काय करू नये? जे मार्गदर्शन तेथून त्याला लाभेल त्याचा स्वीकार आढेवेढे न घेता करतो आणि त्याच्या विरोधी प्रत्येक गोष्ट तो रद्द करतो, तो आणि केवळ तोच 'मुस्लिम' आहे. ते अशासाठी की त्याने स्वत:ला पूर्णत: अल्लाहच्या हवाली केले आणि स्वत:ला अल्लाहच्या हवाली करणेच मुस्लिम असणे होय.

याउलट जो मनुष्य पवित्र कुरआन व प्रेषितांच्या परंपरेचा अवलंब करीत नाही तर त्याच्या मनाला वाटेल तसे करतो, अथवा वाडवडिलांपासून जे काही चालत आले आहे त्याचे अनुसरण करतो. जगात जे काही घडत आहे त्यानुसार वागतो आणि त्याच्या प्रश्नासंबंधी पवित्र कुरआन व सुन्नत (प्रेषितांची परंपरा) कडे विचारणा करण्याची गरजच त्याला वाटत नाही. त्याला कळले की पवित्र कुरआन व सुन्नतचा असा आदेश आहे आणि मग त्याच्या उत्तरादाखल असे म्हणतो की माझ्या बुद्धीला हे मान्य नाही म्हणून मी ती गोष्ट मान्य करीत नाही. अथवा वाडवडिलांपासून तर याउलट कृत्य होत राहिले आहे म्हणून मी त्याचे अनुसरण करणार नाही. तसेच जगाची पद्धत

याच्या उलट आहे म्हणून मी त्यावरच चालेन. तर असा मनुष्य कदापि मुस्लिम नाही. जर तो स्वतःला मुस्लिम म्हणत असेल तर तो खोटे बोलत आहे.

मुस्लिमाची कर्तव्ये

तुम्ही जेव्हा *"ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह"* या कलिमः (मुस्लिमांचा मूळ धर्ममंत्र) चे पठन करता आणि मुस्लिम असल्याचे मान्य करता तेव्हा तुम्ही जणू या गोष्टीचा स्वीकार करता की तुमच्यासाठी कायदा केवळ अल्लाहचा आहे, तुमचा शासक केवळ अल्लाह आहे. तुम्ही आज्ञापालन केवळ अल्लाहचे करणार आणि तुमच्या मते सत्य केवळ तेच आहे जे अल्लाहच्या ग्रंथातून व त्याच्या प्रेषितांद्वारे कळले आहे.

याचा अर्थ असा आहे की तुम्ही मुस्लिम झाल्याबरोबर अल्लाहसाठी तुम्ही तुमच्या स्वातंत्र्याचा परित्याग केला. आता तुम्हाला असे म्हणण्याचा अधिकारच उरला नाही की माझे मत असे आहे. जगाची रीत अशी आहे. कुळाचा रिवाज असा आहे किंवा अमुक महाशय अथवा अमुक महाराज असे म्हणतात. अल्लाहची वाणी आणि त्याच्या प्रेषिताची परंपरा असता तुम्ही त्यांच्यापैकी कोणतीही गोष्ट करू शकत नाही.

आता तुमचे काम हे आहे की, प्रत्येक गोष्ट पवित्र कुरआन व सुन्नत (प्रेषित मुहम्मद (स.) यांची परंपरा) च्या कसोटीवर पारखावी. जे काही त्यांच्याप्रमाणे असेल त्याचा स्वीकार करावा. जी गोष्ट त्यांच्यानुसार नसेल तिला उचलून फेकून द्यावे, मग ती गोष्ट कोणाची का असेना आणि ती पद्धत मग कोणाची का असेना. एकीकडे तर स्वतःला मुस्लिम म्हणावयाचे आणि दुसरीकडे पवित्र कुरआन व सुन्नतच्या विरोधात स्वतःचे विचार अथवा जगाच्या रीती किंवा एखाद्या माणसाच्या कथन अथवा कर्माला प्राधान्य द्यावयाचे, या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधी आहेत.

ज्याप्रमाणे एखादा आंधळा स्वतःला डोळस म्हणू शकत नाही आणि एखादा नकटा स्वतःला नाकवाला म्हणू शकत नाही, त्याचप्रमाणे एखादा असला मनुष्य स्वतःला मुस्लिम सुद्धा म्हणू शकत नाही जो आपल्या जीवनाच्या सर्व बाबी पवित्र कुरआन व सुन्नतच्या अधीन करण्यास नकार देतो. तसेच अल्लाह व प्रेषित (मुहम्मद स.) यांच्या विरूद्ध स्वतःची अक्कल

अथवा जगाची प्रथा किंवा एखाद्या व्यक्तीचे वचन किंवा कर्मांना प्रस्तुत करतो.

जो मनुष्य मुस्लिम राहू इच्छित नाही त्याला कोणीही मुस्लिम म्हणून राहण्यास भाग पाडू शकत नाही. त्याला अधिकार आहे की त्याने हवे त्या धर्माचा अवलंब करावा आणि त्याला वाटेल ते आपले नाव ठेवावे. परंतु जेव्हा तो स्वत:ला मुस्लिम म्हणवितो तेव्हा त्याने चांगल्याप्रकारे समजून घ्यावयास हवे की तो त्यावेळेपर्यंतच मुस्लिम राहू शकतो जोपर्यंत तो इस्लामच्या सीमेत राहतो.

अल्लाहची वाणी व प्रेषितांची सुन्नत (प्रेषिताचरण) यांना त्याने सत्य व तथ्यांचे प्रमाण मानावे आणि त्याविरूद्ध असलेल्या प्रत्येक गोष्टीला असत्य मानणे म्हणजे इस्लामची सीमा आहे. जो मनुष्य या सीमेत राहील तोच मुस्लिम होय. या सीमेचे उल्लंघन करणारा इस्लामबाह्य होय. असे असून देखील जर तो स्वत:ला मुस्लिम समजत असेल आणि तसे म्हणवीत असेल तर तो स्वत:ला देखील फसवीत आहे आणि जगाला सुद्धा.

"जे लोक अल्लाहच्या अवतरित केलेल्या कायद्याला अनुसरून न्यायनिवाडा करीत नसतील तेच द्रोही (अनेकेश्वरवादी) होत." *(कुरआन-५:४४)*

कलमा-ए-तय्यबाचा अर्थ

बंधुनो, तुम्हाला कल्पना आहे की मनुष्य एका कलम्याचे (पवित्र वचन) पठण करून इस्लामच्या वर्तुळात प्रविष्ठ होतो. तो कलमा देखील काही लांबलचक नाही. केवळ काही शब्द आहेत,

"ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह."

अर्थात- अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही. आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत.

या शब्दांचा जिभेने उच्चार करताच माणसात कमालीचे स्थित्यंतर येते. पूर्वी तो अनेकेश्वरवादी होता, आता तो मुस्लिम झाला. पूर्वी अपवित्र होता, आता पवित्र झाला. पूर्वी अल्लाहच्या प्रकोपास तो पात्र होता, आता तो त्याचा प्रिय बनला. पूर्वी जहन्नममध्ये जाणार होता, आता त्याच्यासाठी जन्नतचे द्वार खुले झाले. गोष्ट एवढ्यावरच थांबत नाही तर या कलम्या (वचना) मुळेच माणसामाणसात फार फरक पडतो. जे या कलम्याचे पठन करणारे आहेत ते सर्वजण एका जमातीचे बनतात, जे याचा इन्कार करतात ते दुसऱ्या जमातीचे ठरतात. वडील कलमा पठन करणारा असेल व मुलगा त्याचा इन्कार करणारा असेल तर जणू बाप बाप उरला नाही आणि पुत्र पुत्र राहिला नाही. महिलांच्या संपत्तीपैकी त्याला वारसा मिळणार नाही. आई व भगिनी सुद्धा त्याच्यापासून गोशा पाळू लागतील. (जरी इस्लामी कायद्याची अशी आज्ञा नाही की आईने अनेकेश्वरवादी मुलापासून व बहिणीने अनेकेश्वरवादी भावापासून गोशा पाळावा तरी व्यवहार्यत: धार्मिक विश्वासाची आब बाळगणाऱ्या स्त्रियांना असल्या मुलांची व भावांची तोंडे देखील पाहणे पसंत नसते.) परका मनुष्य कलमा (वचन) करणारा आहे आणि या घराची मुलगी त्याची पत्नी आहे तर त्याला आणि त्याच्या संततीला या घराकडून वारसा हक्क प्राप्त होईल. परंतु हा तुमच्या वीर्याने जन्मलेला मुलगा केवळ कलम्याला मानीत नाही म्हणून तो परक्यापेक्षा परका बनेल. हा कलमा जणू अशी गोष्ट आहे जी परक्याची एकमेकांशी भेट करविते आणि तसेच एकमेकांना तोडते सुद्धा. या कलम्यात इतकी शक्ती आहे की रक्त आणि गर्भाचे संबंध सुद्धा याच्या तुलनेत काहीही नाहीत.

एवढा मोठा फरक का?

आता थोडा या गोष्टीचा विचार करा की अखेर माणसामाणसात एवढा मोठा फरक का पडतो? कलमामध्ये असे काय आहे? केवळ काही अक्षरे तर आहेत! लाम, अलिफ, हे, मीम, वाव, सीन आणि अशीच आणखी दोन चार अक्षरे यात आहेत. ही अक्षरे एकत्र करून जर तोंडाने उच्चारली तर काही अशी जादू होते की माणसाचा कायापालट व्हावा? काय केवळ इतक्याशा गोष्टीने माणसामाणसात आकाश-पाताळाचे अंतर पडू शकते? माझ्या बंधुनो, जर तुम्ही थोडा विवेकाचा वापर केला तर तुमची बुद्धी स्वत: सांगेल की फक्त तोंड उघडून जीभ हलवून काही अक्षरांचा उच्चार केल्याने एवढा मोठा प्रभाव पडू शकत नाही. मूर्तीपूजक अनेकेश्वरवादी तर अवश्य समजतात की केवळ एका मंत्राच्या पठनाने पर्वत गतिमान होईल, पृथ्वी दुभंगेल आणि स्रोत फुटतील. मग मंत्राचा अर्थ कोणाला कळो की न कळो. त्यांची अशी समजूत आहे की सर्व प्रभाव आहे तो केवळ अक्षरात आहे. त्यांचा जिभेने उच्चार केला न केला तोपर्यंत जादूने दरवाजे सताड उघडले गेले. परंतु इस्लाममध्ये ही गोष्ट नाही. यात मौलिक गोष्ट म्हणजे अर्थ होय. अक्षरांचा प्रभाव त्यांच्या अर्थामुळे आहे. जर अर्थ नसेल आणि त्याने हृदयाचा ठाव घेतला नाही तर निव्वळ शब्दोच्चारांचा काहीही प्रभाव पडणार नाही.

हे मी एका ढोबळ उदाहरणाने तुम्हाला समजावून देतो. असे समजा की तुम्हाला थंडी वाजत आहे. जर तुम्ही जिभेने कापूस, दुलई, कापूस, दुलई म्हणून आक्रोश करू लागला तर थंडी वाजण्याचे बंद होणार नाही. मग तुम्ही रात्रभरात एक लक्ष वेळा कापूस, दुलईचा जप का करे ना. परंतु जर दुलईत कापूस भरून ती पांघरली तर थंडी वाजणे बंद होईल. समजा की तुम्हाला तहान लागली आहे. तुम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाणी पाणी करून आक्रोश करीत राहिला तरी तुमची तहान शमणार नाही. परंतु जर पाण्याचा एक घोट तुम्ही प्याला तर काळजाची संपूर्ण आग ताबडतोब थंड होईल. असे समजा की तुम्हाला सर्दी-पडसे व तापाचा त्रास आहे. अशा स्थितीत जर तुम्ही बनफशा गावजबान, बनफशा गावजबान (युनानी औषध) वगैरेचा मंत्रोच्चार करीत राहिला तर सर्दी-पडसे व तापात कसलीही कमतरता येणार नाही. परंतु या औषधांचा काढा करून तुम्ही प्याला तर सर्दी-पडसे व ताप आपोआप

पलायन करतील. अगदी हुबेहूब हीच स्थिती कलमा-ए-तय्यबाची आहे. फक्त सहा-सात शब्दांच्या उच्चाराने एवढा मोठा फरक पडत नाही की माणसाने अनेकेश्वरवादी न राहता त्याने मुस्लिम बनावे, अपवित्र न राहता पवित्र बनावे, धिक्कारलेला न राहता प्रिय बनावे, नरकवासी न राहता स्वर्गाचा हक्क त्याने प्राप्त करावा. हे परिवर्तन केवळ त्या स्थितीत घडून येईल की जेव्हा तुम्ही या शब्दांचा अर्थ समजून घ्याल आणि तो अर्थ तुमच्या हृदयाचा ठाव घेईल. मग अर्थज्ञान झाल्यावर जेव्हा तुम्ही या शब्दांचा जिभेने उच्चार कराल तेव्हा तुम्हाला याची चांगल्या प्रकारे जाणीव होईल की तुम्ही आपल्या ईश्वरासमोर आणि संपूर्ण जगासमोर केवढ्या महान गोष्टीची प्रतिज्ञा करीत आहात. तसेच या प्रतिज्ञेमुळे तुमच्यावर केवढी मोठी जाबाबदारी येऊन पडली आहे. मग तुम्ही समजून उमजून या गोष्टीची प्रतिज्ञा केली आहे तर यानंतर तुमच्या विचारसरणीवर व तुमच्या संपूर्ण जीवनावर या कलम्याचा कब्जा झाला पाहिजे. यानंतर तुम्ही आपल्या हृदयात व मेंदूत कोणत्याही अशा गोष्टीस स्थान देणार नाही जी या कलम्याच्या विरोधात असेल. याशिवाय तुम्हाला नेहमीसाठी या निर्णयाप्रत पोहचावे लागेल की जे या कलम्याच्या विरूद्ध आहे ते खोटे आहे आणि हा कलमा खरा आहे. एवढेच नव्हे तर जीवनाच्या सर्व बाबतीत हा कलमा तुमचा अनुशासक असला पाहिजे. या कलम्याची प्रतिज्ञा केल्यानंतर तुम्ही अनेकेश्वरवादीप्रमाणे हवे ते करण्यास मुक्त नाही. आता तुम्ही या कलम्याच्या बंधनात आहात. तो जे सांगेल तद्वत तुम्हाला करावे लागेल आणि ज्यास तो मनाई करील त्याचा त्याग करावा लागेल. अशा प्रकारे कलम्याचे पठन केल्यास मनुष्य मुस्लिम बनतो. अशा तऱ्हेने कलम्याचे पठन केल्यामुळे मनुष्यमनुष्यात किती मोठा फरक पडतो याचा उल्लेख मी आताच तुमच्यासमोर केला आहे.

कलमा (पवित्र वचन) चा अर्थ

आता मी कलम्याचा अर्थ काय आहे आणि त्याचे पठन करून मनुष्य कोणत्या गोष्टीची प्रतिज्ञा करतो व ते मान्य केल्याबरोबर मनुष्यावर कोणत्या गोष्टी बंधनकारक ठरतात, हे तुम्हाला सांगतो.

कलम्याचा अर्थ असा आहे की 'अल्लाहशिवाय कोणीही अन्य ईश्वर नाही आणि आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत.' कलम्यात '*इलाह*'चा (ईश्वराचा) जो शब्द आलेला आहे त्याचा अर्थ 'अल्लाह' आहे. अल्लाह त्याला म्हणतात जो मालक, शासक, निर्माता, पालनकर्ता व पोषणकर्ता आहे. प्रार्थना ऐकणारा व स्वीकार करणारा आहे. तो उपासनेस पात्र आहे.

आता जेव्हा तुम्ही *'ला इलाहा इल्लल्लाह'*चा उच्चार केला तेव्हा याचा अर्थ असा झाला की प्रथम तर तुम्ही हे मान्य केले की या जगाची निर्मिती अल्लाहशिवाय झालेली नाही आणि या जगाचे अनेक ईश्वरही नाहीत. तर मुळात या जगाचा ईश्वर आहे. तो एकच आहे आणि त्याच्याशिवाय ईशत्व कोणाचेही नाही. दुसरा म्हणजे तुम्ही कलम्याचे (पवित्र वचन) पठन केल्याबरोबर मान्य केले ते असे की तोच एक ईश्वर तुमचा व संपूर्ण जगाचा स्वामी आहे.

तुम्ही मान्य केले की तुमची प्रत्येक वस्तु व जगातील प्रत्येक वस्तु त्याची आहे. तो निर्माता आहे, अन्न देणारा आहे, मृत्यु व जीवन त्याच्याकडूनच आहे. संकट व सौख्य सुद्धा त्याच्याकडूनच आहे. जे काही एखाद्याला प्राप्त होते ते देणारा वास्तविकत: तोच आहे. जे काही एखाद्याकडून हिरावून घेतले जाते ते वास्तविकत: हिरावून घेणारा तोच आहे. भीती बाळगावयाची असेल तर त्याची, मागावयाचे असेल तर त्याच्याकडून, मान तुकवावयाची असेल तर त्याच्यासमोर, उपासना व गुलामी करावयाची असेल तर त्याची करावी. त्याच्याशिवाय आम्ही कोणाचेही दास अथवा गुलाम नाही, त्याच्याशिवाय आमचा कोणीही स्वामी व शासक नाही. आमचे मूळ कर्तव्य असे आहे की आम्ही त्याची आज्ञा पाळावी व त्याच्याच कायद्याचे पालन करावे.

अल्लाहशी करारमदार

"ला इलाहा इल्लल्लाह'ची दीक्षा घेतल्याबरोबर तुम्ही तुमच्या अल्लाहशी संपूर्ण जगाला साक्ष ठेवून एक करार करता. तुम्ही त्याचे उल्लंघन कराल तर तुमची जीभ, तुमचे हात-पाय, तुमचा रोम-रोम आणि पृथ्वी व आकाशातील प्रत्येक कण ज्यांच्यासमोर तुम्ही खोटा करार केला होता, ते तुमच्याविरूद्ध अल्लाहच्या न्यायालयात ग्वाही देतील. त्या वेळी तुम्ही तेथे अशा हताश अवस्थेत उभे असाल की एकसुद्धा साक्षीदार तुमची बाजू मांडण्यास तुम्हाला मिळणार नाही. कोणताही वकील अथवा बॅरिस्टर तुमचा खटला चालविण्यास तुम्हाला मिळणार नाही. एवढेच नव्हे तर खुद्द वकीलसाहेब व बॅरिस्टरसाहेब जे जगाच्या न्यायालयात कायद्यात उलटापालट करीत फिरतात, तेसुद्धा तेथे तुमच्याप्रमाणेच लाचारीच्या अवस्थेत उभे असतील. ते न्यायालय असे नाही की जेथे तुम्ही खोट्या साक्षी व बनावट कागदपत्र सादर करून चुकीच्या पद्धतीने खटला चालवून वाचू शकाल.

जगातील पोलिसांपासून तुम्ही तुमचा गुन्हा लपवू शकाल, परंतु अल्लाहच्या पोलिसापासून लपवू शकणार नाही. जगातील पोलीस लाच खाऊ शकतील, परंतु अल्लाहचे पोलीस लाच खाणार नाहीत. जगातील साक्षीदार खोटे बोलू शकतील, अल्लाहचे साक्षीदार पूर्णपणे सत्यवादी आहेत. जगातील प्रशासक अन्याय करू शकतील, परंतु अल्लाह असला प्रशासक नाही की जो अन्याय करील. याशिवाय अल्लाह त्या तुरुंगात डांबून टाकील त्यातून पलायन करण्याचा कोणताही मार्ग नाही. अल्लाहशी खोटे करारपत्र करणे मूर्खपणाचे होय. हा महामूर्खपणा होय. जेव्हा तुम्ही करार करता तेव्हा खूप समजून उमजून करा व तो पूर्ण करा. तुमच्यावर कसलीही जबरदस्ती नाही की तुम्ही विनाकारण तोंडी करार करावा. केवळ जिभेने करार करणे व्यर्थ आहे.

प्रेषितांच्या मार्गदर्शनाची स्वीकृती

"ला इलाहा इल्लल्लाह" म्हटल्यानंतर तुम्ही "मुहम्मदुर्रसूलुल्लाह" असे म्हणता. याचा अर्थ असा आहे की तुम्ही हे मान्य केले की आदरणीय मुहम्मद (स.) हेच ते प्रेषित आहेत ज्यांच्या माध्यमाने अल्लाहने आपला कायदा तुमच्यापर्यंत पाठविला आहे. अल्लाहला आपला स्वामी सम्राट मानल्यानंतर हे जाणणे आवश्यक ठरते की बादशाहाचे कोणते आदेश

आहेत? आम्ही कोणती कृत्ये करावीत की ज्याने तो प्रसन्न होतो आणि कोणती कृत्ये करू नयेत की ज्यामुळे तो अप्रसन्न होतो? कोणत्या कायद्याचे पालन केल्यास तो आम्हाला क्षमा करील आणि त्याचे उल्लंघन केल्यास तो आम्हाला शिक्षा करील. हे सर्व सांगण्यासाठी अल्लाहने आदरणीय मुहम्मद (स.) यांना आपला प्रेषित म्हणून नेमले. त्यांच्यातर्फे आपला ग्रंथ आमच्याकडे पाठविला आणि त्यांनी अल्लाहच्या आज्ञेप्रमाणे आपले जीवन व्यतीत करून आम्हास दाखविले की मुस्लिमांनी अशा प्रकारे जीवन जगावे.

मग जेव्हा तुम्ही *"मुहम्मदुर्रसूलुल्लाह"*चा उच्चार केला तेव्हा तुम्ही प्रतिज्ञा केली की जो कायदा व जी प्रणाली प्रेषित (मुहम्मद स.) यांनी दाखविली आहे तिचा अवलंब तुम्ही कराल आणि जो कायदा त्याच्याविरूद्ध आहे त्याचा तुम्ही धिक्कार कराल. अशी प्रतिज्ञा केल्यानंतर तुम्ही प्रेषितांनी आणलेल्या कायद्याला धाब्यावर बसविले आणि जगातील कायद्याचे पालन करीत राहिला तर तुमच्यापेक्षा मोठा खोटारडा आणि बेईमान कोणीही असणे शक्य नाही. याला कारण असे की अशीच खात्री करून तुम्ही इस्लाममध्ये प्रवेश केला होता की आदरणीय मुहम्मद (स.) यांनीच आणलेला कायदा सत्य आहे व त्याचा अवलंब करण्याचे तुम्ही ठरविले होते. मात्र प्रतिज्ञेमुळे तर तुम्ही मुस्लिमांचे भाऊ बनला. याच प्रतिज्ञेमुळे तर तुम्ही मुस्लिमाचे भाऊ बनला, यामुळेच तर तुम्ही वडिलोपार्जित संपत्ती प्राप्त करू शकला. यामुळेच तुमचा एका मुस्लिम स्त्रीशी विवाह संपन्न झाला. यामुळेच तर तुमची संतती तुमची वैध संतती ठरली. यामुळेच तुम्हाला हा हक्क पोचला की मुस्लिमांनी तुमचे सहाय्यक बनावे, तुही जकात अदा करावी, तुमच्या प्राण, संपत्ती आणि लाज-अब्रूच्या रक्षणाची जबाबदारी घ्यावी.

अशा सर्व गोष्टी असूनदेखील तुम्ही आपल्या प्रतिज्ञेचा भंग केला. याच्यापेक्षा मोठी या जगात अन्य कोणती बेईमानी असू शकेल? ज्याअर्थी तुम्ही *"ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह"*चा अर्थ जाणता आणि समजून उमजून ते मान्य करता त्या अर्थी तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत अल्लाहच्या कायद्याचे पालन करणे भाग आहे. त्याच्या पालनास भाग पाडण्यासाठी मग पोलीस व न्यायालय या जगात असोत की नसोत. जो मनुष्य असे समजतो की अल्लाहचे पोलीस, फौज, न्यायालय व तुरुंग कोठेही नाहीत, म्हणून त्याच्या कायद्याचे उल्लंघन करणे सोपे आहे आणि सरकारचे

पोलीस, फौज, न्यायालय व तुरुंग आहेत म्हणून त्याचे कायदे मोडणे कठीण आहे; अशा माणसाबद्दल मी स्पष्ट सांगू इच्छितो की तो *"ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह"*ची खोटी प्रतिज्ञा करीत आहे. तो अल्लाहला, साऱ्या जगाला, सर्व मुस्लिमांना व स्वतःला फसवीत आहे.

वचनबद्धतेच्या जबाबदाऱ्या

बंधुनो आणि मित्रहो! आता मी तुमच्यासमोर 'कलमा-ए-तय्यबा'चा अर्थ सांगितला आहे. आता याचसंबधी अन्य एका पैलूकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो.

तुम्ही हे स्वीकार करता की अल्लाह तुमचा आणि प्रत्येक वस्तूचा स्वामी आहे. याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ असा आहे की तुमचा प्राण तुमचा स्वतःचा नव्हे आणि तुमचे डोळे, कान व तुमच्या शरीराचा कोणताही अवयव तुमच्या स्वतःचा नव्हे. ही शेती जी तुम्ही नांगरता, ही जनावरे ज्यांची सेवा तुम्ही घेता, ही मालमत्ता जिचा लाभ तुम्ही घेता, यापैकी सुद्धा कोणतीही वस्तु तुमची नाही. प्रत्येक वस्तु अल्लाहची मिळकत आहे आणि ती तुम्हाला अल्लाहकडून देणगी म्हणून मिळाली आहे. हे मान्य केल्यानंतर तुम्हाला असे सांगण्याचा काय अधिकार आहे की प्राण माझा आहे, शरीर माझे आहे, माल माझा आहे आणि अमुक वस्तु माझी आहे व तमुक वस्तु माझी आहे. दुसऱ्याला मालक म्हणणे व मग त्याच्या वस्तूला आपली ठरविणे अगदीच तथ्यहीन गोष्ट आहे.

खरोखर ही गोष्ट तुम्ही मनापासून मान्य करीत असाल की सर्व वस्तूंचा मालक अल्लाहच आहे. तर यामुळे दोन गोष्टी आपोआप तुमच्यावर बंधनकारक ठरतात. एक म्हणजे स्वामी अल्लाहच आहे आणि त्याने त्याची मिळकत ठेव म्हणून तुमच्या हवाली केली आहे. तुमचे कर्तव्य असे आहे की तुम्ही या वस्तूंचा विनियोग त्या स्वामीच्या इच्छेप्रमाणेच केला पाहिजे. त्याच्या इच्छेविरूद्ध जर तुम्ही त्यांचा उपयोग करीत असाल तर ती फसवेगिरी आहे. तुम्हाला तर त्याच्या पसंतीविरूद्ध हात, पायसुद्धा हलविण्याचा अधिकार नाही. तुम्हाला तर तुमची पोटात असा कोणताही पदार्थ घालण्याचा अधिकार नाही जो त्याच्या मर्जीविरूद्ध असेल. स्वामीच्या इच्छेविरूद्ध तुमचा या जमिनी व संपत्तीवर कसलाही अधिकार नाही. तुमची पत्नी व तुमची संततीसुद्धा तुम्हाला

स्वामीने दिलेल्या आहेत म्हणून तुमच्या आहेत. म्हणून त्यांच्याशीसुद्धा स्वत:च्या इच्छेनुसार नव्हे तर अल्लाहच्या आज्ञेप्रमाणेच व्यवहार केला पाहिजे. याविरूद्ध कृती कराल तर तुम्ही अपहरणकर्ते ठराल. ज्याप्रमाणे तुम्ही दुसऱ्याच्या जमिनीवर कब्जा करणाऱ्यास बेईमान म्हणता त्याचप्रमाणे अल्लाहने दिलेल्या वस्तूंना तुम्ही स्वत:च्या समजून तुमच्या मर्जीप्रमाणे त्यांचा प्रयोग कराल अथवा अल्लाहला सोडून इतर कोणाच्या इच्छेप्रमाणे त्यांचा उपयोग कराल तर तोच बेईमानीचा अपराध तुम्हावर देखील लागू होईल. मालकाच्या इच्छेप्रमाणे काम केल्याने काही नुकसान होत असेल तर होऊ द्या. प्राण जात असतील तर जाऊ द्या. हात-पाय तुटत असतील तर तुटू द्या. संततीची हानी होत असेल तर होऊ द्या. मालमत्ता व संपत्ती नष्ट होत असेल तर होऊ द्या. तुम्हाला दु:ख होण्याचे काय कारण? ज्याची वस्तु आहे त्यालाच नुकसान पसंत असेल तर तो त्याचा अधिकार आहे. परंतु स्वामीच्या इच्छेविरूद्ध केले आणि त्यात नुकसान झाले तर नि:शंकपणे तुम्ही अपराधी ठराल, कारण दुसऱ्याचा माल खराब केला. तुम्ही तुमच्या प्राणाचे खुद्द मुख्त्यार नाही. मालकाच्या इच्छेप्रमाणे प्राणार्पण कराल तर मालकाचा हक्क अदा कराल. त्याच्याविरूद्ध कृती करण्यासाठी जीव द्याल तर ही बेईमानी होईल.

इस्लाम स्वीकारणे अल्लाहवर उपकार करणे नव्हे

मालकाने जी वस्तु तुम्हाला दिली आहे त्या वस्तूचा विनियोग मालकाच्याच कामासाठी केला तर तुम्ही कोणावरही उपकार केले नाही. मालकावरही नाही आणि कोणावरही नाही. तुम्ही त्याच्या मार्गात काही दिले अथवा काही सेवा केली किंवा प्राण अर्पण केले तर तुमच्या दृष्टीने फार मोठी बाब आहे, तरीसुद्धा या स्थितीत कोणावरही तुम्ही उपकार केले नाही. जास्तीत जास्त जे काम तुम्ही केले ते केवळ इतकेच होय की मालकाचा जो हक्क तुमच्यावर होता तो तुम्ही अदा केला. ही अशी कोणती गोष्ट आहे की ज्यावर एखाद्याने आनंदाने फुगून जावे व अभिमान करावा. त्याने अशी इच्छा बाळगावी की त्याची स्तुती केली जावी आणि असे समजावे की त्याने एखादे महान कार्य केले आहे. त्याबद्दल त्याची महानता मान्य केली जावी?

लक्षात ठेंवा की खरा मुस्लिम स्वामीच्या मार्गात थोडे खर्च केल्यास अथवा थोडी सेवा केल्यास गर्वाने ताठत नाही. तो तर विनम्रतेचा अवलंब

करतो. गर्व केल्याने सत्कार्ये नष्ट होतात. ज्याने प्रशंसेची इच्छा केली आणि त्यासाठी एखादे सत्कार्य केले तर शेवटी अल्लाहच्या दरबारात त्याचे फळ प्राप्त करण्यास तो पात्र राहत नाही. त्याला कारण असे की त्याने केलेल्या सत्कार्याचा मोबदला जगातच मागितला आणि तो त्याला येथेच मिळाला.

अल्लाहचे उपकार आणि आमचे वर्तन

बंधुनो! आपल्या स्वामीचे उपकार पाहा की तो त्याची वस्तु तुमच्याकडून घेतो आणि उलट म्हणतो की मी ही वस्तु तुमच्याकडून खरेदी केली आहे. मी त्याचा मोबदला तुम्हाला देईन. धन्य आहे! या दानशूरता व कृपेला काही पारावार नाही. पवित्र कुरआनमध्ये म्हटले आहे,

"अल्लाहने ईमानधारकांकडून स्वत: त्यांना व त्यांच्या मालमत्तेला स्वर्गाच्या मोबदल्यात खरीदिले आहे." *(कुरआन-९:१११)*

मालकाचा असा तुमच्याशी व्यवहार आहे. आता स्वत:चा व्यवहार देखील पाहून घ्या. जी वस्तु मालकाने तुम्हाला दिली होती आणि मालकाने जी वस्तु मोबदला देऊन तुमच्याकडून खरेदी सुद्धा केली होती ती तुम्ही परक्याच्या हाती विकता. अत्यंत क्षुल्लक मोबदला घेऊन ती तुम्ही विकता. ते तुमच्याकडून मालकाच्या विरूद्ध काम करवून घेतात आणि तुम्ही असे समजून त्यांची सेवा करता जणू ते अन्नदाते आहेत. तुम्ही स्वत:ची बुद्धी विकता, तुमचे हात-पाय विकता, शरीराच्या शक्ती विकता आणि ते सर्वकाही विकता ज्यांची खरेदी अल्लाहचे द्रोही करू इच्छितात. यापेक्षा मोठी अनैतिकता काय बरे असू शकेल? विकलेली वस्तु पुन्हा दुसऱ्यास विकणे कायद्याच्या व नैतिकतेच्या दृष्टीने अपराध आहे. या जगात यावर धोकेबाजी व फसवेगिरीचा खटला चालविला जातो. काय तुम्हाला असे वाटते की यावर अल्लाहच्या न्यायालयात खटला चालविला जाणार नाही?

कलमा-ए-तय्यबा (पवित्र वचन) आणि कलमा-ए-ख़बीसा (अपवित्र वचन)

माझ्या बंधुनो! मागील प्रवचनात मी 'कलमा-ए-तय्यबा'विषयी आपणास थोडे सांगितले होते. हाच कलमा इस्लामचा पाया असल्यामुळे आज पुन्हा याच कलम्याचे थोडे-अधिक स्पष्टीकरण करीत आहे. याच्याद्वारेच मनुष्य इस्लाममध्ये प्रविष्ठ होतो. कोणताही मनुष्य खऱ्या अर्थाने तोपर्यंत मुस्लिम होऊ शकत नाही जोपर्यंत तो हा कलमा पूर्णपणे समजून घेत नाही व स्वतःचे जीवन याच्याप्रमाणे बनवीत नाही.

महान अल्लाहने पवित्र कुरआनमध्ये या कलम्याची प्रशंसा अशा प्रकारे केली आहे,

"तुम्ही पाहत नाही काय की अल्लाहने 'पवित्र वचना'ला कशाची उपमा दिली आहे? त्याची उपमा अशी आहे जणू एका चांगल्या जातीचा वृक्ष ज्याचे मूळ जमिनीत खोलवर रुजले आहे आणि फांद्या आकाशाला भिडल्या आहेत, प्रत्येक क्षणी ते आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेने फळे देत आहे. ही उदाहरणे अल्लाह याकरिता देत आहे की लोकांनी यापासून बोध घ्यावा. आणि दुर्वचनाची उपमा एका हलक्या प्रतीच्या झाडासारखी आहे जे जमिनीच्या पृष्ठावरून उपटून फेकले जाते, त्यांच्यासाठी कसलीच दृढता नाही. ईमानधारकांना अल्लाह एका दृढ वचनाच्या आधारावर इहलोक व परलोक दोहोंमध्ये स्थैर्य प्रदान करतो आणि अत्याचाऱ्यांना अल्लाह पथभ्रष्ट करतो, अल्लाहला अधिकार आहे जे हवे ते करतो." (कुरआन-१४:२४-२७)

याचा अर्थ असा की 'कलमा-ए-तय्यबा'चे उदाहरण असे आहे जसे एखाद्या चांगल्या जातीचे वृक्ष असावे. त्याची मुळे जमिनीत चांगली स्थिर असावीत आणि त्याच्या शाखा आकाशापर्यंत पसरलेल्या असाव्यात. ते वृक्ष आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेने प्रत्येक वेळी फळेच फळे देत असावे. याच्या उलट 'कलमा-ए-ख़बीसा' म्हणजे वाईट श्रद्धा व असत्य वचन. जसे एखादे वाईट जातीचे आपोआप उगवलेले रोपटे असावे की जे जमिनीच्या वरवर असते. ते साध्या इशाऱ्याने आपली मुळे सोडते. कारण त्याची मुळे खोलवर

दृढ झालेली नसतात.

हे एक असले अनुपम उदाहरण आहे की जर तुम्ही यावर विचार कराल तर तुम्हाला चांगला बोध मिळेल. पाहा, तुमच्यासमोर दोन्ही प्रकारच्या झाडांची उदाहरणे आहेत. एक तर हे आंब्याचे झाड आहे. किती खोलवर गेलेले आहे, किती उंचीपर्यंत पोहचलेले आहे! याच्या फांद्या किती लांबवर पसरलेल्या आहेत! किती गोमटी फळे याला लागतात! हे गुण त्याला का प्राप्त झाले आहेत? त्याला कारण असे की त्याची कोय कठीण होती. तिला वृक्ष बनविण्याचा अधिकार होता आणि तो अधिकार इतका खरा होता की जेव्हा कोयीने तिच्या हक्काचा दावा केला तेव्हा जमीन, पाणी, हवा आणि दिवसाची उष्णता व रात्रीच्या गारव्याने एवढेच नव्हे तर प्रत्येक वस्तूने तिचा अधिकार मान्य केला आणि तिने ज्याच्याडून जे काही मागितले प्रत्येकाने तिला दिले. अशा प्रकारे ती कोय तिच्या अधिकाराच्या बळावर एवढा विशाल वृक्ष बनली की त्या वृक्षाने स्वत:ची गोड फळे देऊन सिद्ध केले की खरोखर ते असे विशाल वृक्ष बनण्यास पात्र होते आणि पृथ्वी व आकाशातील सर्व शक्तींनी मिळून त्याला साद दिली तर त्यात काहीही वावगे नव्हते. इतकेच नव्हे तर त्यांना असेच करणे भाग होते. ते अशासाठी की वृक्षांना अन्न-पुरवठा करणे, वाढविणे व पिकविण्याची जी क्षमता जमीन, पाणी, हवा व इतर वस्तुंजवळ आहे ती याच कामासाठी तर आहे की ती चांगल्या जातीच्या झाडांना उपयुक्त ठरावी.

याच्या तुलनेत ही झाडे-झुडुपे आणि आपोआप येणारी झुडुपे आहेत. त्यांची शक्ती तरी काय आहे? इतकी आखुड मुळी की लहान मुलाने सुद्धा उपटून टाकावे. नरम व ठिसूळ इतके की वाऱ्याच्या एका झुळुकामुळे त्यांनी कोमेजून जावे. हात लावल्यास त्याचा काटा तुम्हाला इजा करील. चाखल्यास तोंडाची चव खराब होईल. दररोज किती उत्पन्न होतात आणि किती उपटली जातात! त्यांची स्थिती अशी का आहे? ते अशासाठी की त्यांच्यापाशी अधिकाराचे ते बळ नाही जे आंब्याच्या झाडाजवळ आहे. चांगल्या जातीची झाडे नसतील तर जमीन उगाच पडून पडून कंटाळते. आणि या झुडुपांना आपल्यात सामावून घेते. थोडी फार मदत पाण्याची देखील होते. काही वाऱ्याकडून सहाय्य मिळते. परंतु जमीन व आकाशातील कोणतीही वस्तु अशा झुडुपांचा अधिकार मानण्यास राजी होत नाहीत. म्हणून जमीन त्यांच्या

मुळ्या पसरू देत नाही आणि पाणी सुद्धा उदार मनाने त्यांना अन्न पुरवीत नाही आणि हवा देखील उदारतेने त्यांचे संगोपन करीत नाही. मग जेव्हा इतक्या क्षुल्लक शक्तीनिशी ही अपवित्र झुडुपे बेचव, काटेरी व विषमय बनून वाढतात तेव्हा खरोखर असे सिद्ध होते की जमीन व आकाशातील शक्ती अशा झुडुपांना वाढविण्यासाठी नव्हत्या. त्यांना हे इतके जीवन मिळाले ते फार झाले. ही दोन्ही उदाहरणे समोर ठेवा आणि मग कलमा-ए-तय्यबा (पवित्र वचन) व कलमा-ए-ख़बीसा (अपवित्र वचन) यामधील फरकाचा विचार करा.

कलमा-ए-तय्यबा काय आहे?

कलमा-ए-तय्यबा काय आहे? हे सत्य आहे. हे निरंकुश सत्य आहे याच्यापेक्षा अधिक सत्य दुसरे असू शकतच नाही. संपूर्ण जागाचा ईश्वर एक अल्लाह आहे. या गोष्टीची ग्वाही पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु देत आहे. ही माणसे, ही जनावरे, हे वृक्ष, हे दगड, हे वाळूचे कण, हे वाहणारे कालवे, हा चमकणारा सूर्य, या सर्वत्र पसरलेल्या सर्व वस्तु, यांपैकी कोणती अशी वस्तु आहे की जिला अल्लाहशिवाय अन्य कोणी निर्माण केले आहे? ती अल्लाहशिवाय कोणा दुसऱ्यांच्या कृपेने कशी जिवंत व कायम राहू शकेल? अल्लाहशिवाय अन्य कोणी तिला नष्ट करू शकेल? मग जेव्हा हे संपूर्ण जग अल्लाहची निर्मिती आहे आणि अल्लाहच्या कृपेने ते टिकून आहे आणि अल्लाहच त्याचा स्वामी व शासक आहे.

ज्या वेळी तुम्ही म्हणाल, "या जगात या एका अल्लाहशिवाय इतर कोणाचेही ईशत्व नाही." तेव्हा पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु मोठ्या आवाजात म्हणेल, "तू अगदी सत्य सांगितले आहेस. आम्ही सर्वजण तुझ्या त्या कथनाच्या सत्यतेची ग्वाही देतो. जेव्हा तू त्याच्यासमोर नतमस्तक होशील तेव्हा सृष्टीतील प्रत्येक वस्तु तुझ्याबरोबर नतमस्तक होईल. त्याचे कारण असे की या सर्व वस्तुदेखील त्याचीच उपासना करतात. जेव्हा तुम्ही त्याच्या आज्ञेचे पालन कराल तेव्हा पृथ्वीवरील व आकाशातील प्रत्येक वस्तु तुम्हाला साद देईल, कारण या सर्वच वस्तु त्याच ईश्वारच्या आज्ञेचे पालन करतात. जेव्हा तुम्ही त्याच्या मार्गात चालाल तेव्हा तुम्ही एकटेच नसाल तर सृष्टीतील असंख्य फौज तुमच्याबरोबर चालेल, कारण आकाशातील सूर्यापासून

पृथ्वीतील एका क्षुल्लक कणापर्यंत प्रत्येक वस्तु निरंतर त्याच्याच मार्गात तर चालत आहे. तुम्ही त्याच्यावर विश्वास कराल तर कोणत्याही लहान शक्तीवर तुम्ही विश्वास करणार नाही. तर त्या वैभवशाली शक्तीवर विश्वास कराल जो पृथ्वी व आकाशातील सर्व खजिन्यांचा मालक आहे.''

तात्पर्य असे की या सत्यावर तुम्ही लक्ष ठेवाल तर तुम्हाला कळेल की कलमा-ए-तय्यबावर ईमान (विश्वास) आणून जो मनुष्य स्वत:चे जीवन त्याचप्रमाणे बनवील तर पृथ्वी व आकाशातील सर्व शक्ती त्याला सहकार्य करतील. या जगापासून पारलौकिक जीवनापर्यंत तो उत्कर्ष करीत राहील. एक क्षणभर सुद्धा अपयश व निराशा त्याच्याजवळ फिरकणार नाही. हेच महान अल्लाहने अशा प्रकारे सांगितले आहे, ''हा कलमा असले झाड आहे की ज्याच्या मुळ्या जमिनीत दृढ झाल्या आहेत, फांद्या आकाशात पसरल्या आहेत आणि ते नेहमी अल्लाहच्या आज्ञेने फळे देत राहते.''

कलमा-ए-ख़बीस काय आहे?

याच्या तुलनेत कलमा-ए-ख़बीस पाहा. कलमा-ए-ख़बीस काय आहे? याचा अर्थ असा की जगाचा कोणीही ईश्वर नाही, किंवा असे की एका अल्लाहशिवाय अन्य एखाद्याचे ईश्वरत्व आहे. विचार करा की याच्यापेक्षा अधिक खोटी व अवास्तव अन्य कोणते वचन असू शकते? पृथ्वी किंवा आकाशातील कोणती वस्तु याची साक्ष देते?

द्रोही म्हणतो, ''ईश्वर नाही.''

पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु म्हणते, ''तू खोटा आहेस. आम्हाला व तुला ईश्वरानेच निर्माण केले आहे आणि त्याच ईश्वराने तुला ती जीभ दिली आहे ज्याद्वारे तू खोटे बोलतोस.''

अनेकेश्वरवादी म्हणतो, ''ईशत्वात दुसरेसुद्धा अल्लाहच्या बरोबरीने सामील आहेत. दुसरेसुद्धा अन्नदाते आहेत, दुसरेसुद्धा मालक आहेत, दुसरेसुद्धा भाग्यविधाते आहेत आणि तेसुद्धा भाग्य बिघडवितात. दुसरेसुद्धा लाभ व हानी पोहचविण्याची शक्ती बाळगतात. दुसरेसुद्धा प्रार्थना ऐकतात. दुसरेसुद्धा इच्छापूर्ती करणारे आहेत. दुसरेसुद्धा भय बाळगण्यास पात्र आहेत. दुसरेसुद्धा विश्वसनीय आहेत. या ईश्वरत्वात दुसऱ्यांचीसुद्धा आज्ञा चालते व अल्लाहशिवाय दुसऱ्याची आज्ञा व कायदे पालन करण्यास योग्य आहेत.''

याच्या उत्तरादाखल पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु म्हणते, "तू अगदीच खोटारडा आहेस. तू जे सांगत आहेस ते वास्तविकतेच्या विरूद्ध आहे."

आता विचार करा, जो मनुष्य या कलम्याचे अवलंब करील आणि त्यानुसार जीवन व्यतीत करील तो या जगात व पारलौकिक जीवनात कसे सुफल प्राप्त करू शकेल? अल्लाहने आपल्या कृपेने अशा लोकांना सवड दिली आहे आणि त्यांना रोजी देण्याचे वचन दिले आहे. म्हणून पृथ्वी व आकाशातील शक्ती कोणत्या न कोणत्या प्रकारे त्यांचे पालनपोषण करतात, ज्याप्रमाणे त्या झाडे-झुडुपे व आपोआप येणाऱ्या रोपट्यांचे सुद्धा पालनपोषण करतात. परंतु सृष्टीतील कोणतीही वस्तु त्यांचा अधिकार म्हणून त्यांना सहयोग देणार नाही आणि पूर्ण शक्तीनिशी त्यांना मदतही करणार नाही. ते याच आपोआप वाढणाऱ्या झाडांप्रमाणे आहेत ज्यांचे उदाहरण आताच मी तुम्हाला दिले आहे.

परिणामांतील फरक

हाच फरक दोघांच्या फलनिष्पत्तीत आहे. कलमा-ए-तय्यब जेव्हा जेव्हा फळे देईल तेव्हा ते गोड लाभदायक फळेच देईल. जगात यामुळे शांती स्थापन होईल. पुण्याई सत्य व न्याय सर्वत्र नांदेल. आणि अल्लाहचे दास त्याचा लाभ घेतील. परंतु कलमा-ए-ख़बीसचे जितके संगोपन होईल तितके त्याच्यापासून काटेरी फांद्यांचीच वाढ होत राहील. त्याला कडू फळेच लागतील. याच्या नसानसातून विषच भरलेले असेल.

जगात स्वत:च्या डोळ्याने पाहा. जेथे इन्कार, अनेकेश्वरवाद व जडवादाने थैमान घातले आहे तेथे काय होत आहे? मनुष्य मनुष्याला फाडून खाण्याच्या तयारीत आहे. वस्त्याच्या वस्त्या उद्ध्वस्त करण्याची व्यवस्था होत आहे. विषारी वायु तयार केले जात आहेत. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचा विध्वंस करण्यास उतावीळ आहे. निर्बळाच्या वाटणीची भाकरी स्वत: हिसकावून खाण्यासाठी सामर्थ्यवान निर्बळांना गुलाम बनवीत आहेत. जो निर्बळ आहे त्याला सैन्य व पोलीस आणि तुरुंग व फाशीच्या दबावाखाली शक्तिमानाचा जुलूम सहन करण्यास भाग पाडले जाते. याशिवाय उक्त राष्ट्रांची आंतरिक स्थिती कशी आहे? त्यांचे चारित्र्य इतके वाईट आहे की शैतानाला देखील

त्याची लाज वाटावी. मानवाकडून ती कृत्ये होत आहेत की जी पशुदेखील करीत नाहीत. माता स्वत:च्या मुलांची हत्या स्वत:च्या हाताने करतात कारण त्यांच्यामुळे विलासितेत विघ्न येऊ नये. पती स्वत:च्या पत्नींना दुसऱ्याच्या बगलेत स्वत: देतात जेणेकरून त्यांच्या पत्नी यांच्या बगलेत याव्यात. नग्न लोकांचे क्लब चालविले जातात. जेथे स्त्री व पुरुष जनावराप्रमाणे एकमेकासमोरून नग्नावस्थेत फिरत असतात. श्रीमंत लोक व्याज घेऊन गरीबांचे रक्त शोषण कतात. धनवान निर्धनाकडून अशा प्रकारे सेवा घेतात जणू काय ते त्याचे गुलाम आहेत आणि त्यांनी केवळ त्यांच्या सेवेसाठीच जन्म घेतला आहे. सांगण्याचा उद्देश असा की या कलमा-ए-ख़बीसपासून जे कोणते रोप जेथे जेथे उत्पन्न झाले ते काट्यांनी भरलेले आहे आणि जे फळ त्याला लागते ते कडू व विषारी असते.

महान अल्लाह ही दोन्ही उदाहरणे दिल्यानंतर शेवटी म्हणतो,

"ईमानधारकांना अल्लाह एका दृढ वचनाच्या आधारावर इहलोक व परलोक दोहोंमध्ये स्थैर्य प्रदान करतो आणि अत्याचाऱ्यांना अल्लाह पथभ्रष्ट करतो, अल्लाहला अधिकार आहे जे हवे ते करतो." (कुरआन-१४:२७)

कलमा मानणारे का अपमानित आहेत?

बंधुनो! कलमा-ए-तय्यबा व कलमा-ए-ख़बीसमधील फरक व दोन्हींचे परिणाम काय आहेत हे तुम्ही ऐकले. आता तुम्ही असा प्रश्न अवश्य कराल की आम्ही तर कलमा-ए-तय्यबा मानणारे आहोत, मग काय कारण आहे की आमची प्रगती होत नाही आणि अनेकेश्वरवादी जे कलमा-ए-ख़बीसा मानणारे आहेत त्यांचा विकास होत आहे?

याचे उत्तर देणे माझी जबाबदारी आहे आणि ते मी या अटीवर देईन की तुमच्यापैकी कोणीही माझ्या उत्तराचे वाईट मानून घेऊ नये. त्याने स्वत:च्या मनाला विचारावे की माझे उत्तर खरोखर बरोबर आहे किंवा नाही.

तुमचे हे म्हणणे चूक आहे की तुम्ही कलमा-ए-तय्यबा मानता आणि तरीसुद्धा तुमची प्रगती होत नाही. कलमा-ए-तय्यबाला मानण्याचा अर्थ जिभेने कलम्याचे उच्चार करणे नव्हे. याचा अर्थ मनापासून मानणे होय आणि ते अशा प्रकारे मानावे की त्याच्या उलट कोणतीही श्रद्धा तुमच्या मनात असू नये आणि कोणतेही काम त्याच्याविरूद्ध तुमच्याकडून केले जाऊ नये.

माझ्या बंधुनो! कृपया मला सांगा की काय खरोखर तुमची स्थिती अशीच आहे? काय कलमा-ए-तय्यबाच्या अगदी विरूद्ध असे शेकडो अनेकेश्वरवादी व नास्तिक विचार तुमच्यात पसरलेले नाहीत? काय मुस्लिम अल्लाहशिवाय दुसऱ्यासमोर नतमस्तक होत नाहीत? काय मुस्लिम दुसऱ्यांना भीत नाहीत? काय ते दुसऱ्यांच्या मदतीवर विश्वास ठेवीत नाहीत? काय ते दुसऱ्यांना अन्नदाते समजत नाहीत? काय ते अल्लाहच्या कायद्याला सोडून इतरांच्या कायद्यांचे आनंदाने पालन करीत नाहीत? काय स्वत:ला मुस्लिम म्हणविणारे न्यायालयात जाऊन हे स्पष्टपणे सांगत नाहीत की आम्ही शरीअत (अल्लाहचा कायदा) मानत नाही, तर रीतीरिवाजांना मानतो? काय तुमच्यात असले लोक आढळत नाहीत की जे जगातील लाभासाठी अल्लाहच्या कायद्याच्या एखाद्या कलमाचे उल्लंघन करण्यास विलंब लावीत नाहीत? काय तुमच्यात असले लोक नाहीत की ज्यांना अनेकेश्वरवाद्यांच्या प्रकोपाचे भय आहे परंतु अल्लाहच्या प्रकोपाचे भय मात्र नाही? तुम्ही अनेकेश्वरवाद्यांची कृपादृष्टी प्राप्त करण्यासाठी सर्वकाही करण्यास तत्पर असतात? परंतु अल्लाहची कृपादृष्टी प्राप्त करण्यासाठी काहीही करू शकत नाहीत? आणि जे अनेकेश्वरवाद्यांच्या शासनास शासन समजतात आणि अल्लाहच्या शासनाची कधीही आठवण सुद्धा करीत नाहीत की तो सुद्धा कुठेतरी अस्तित्वात आहे? कृपया हे सांगा की काय हे सत्य नाही? जर हे सत्य आहे तर कोणत्या तोंडाने तुम्ही म्हणता की आम्ही कलमा-ए-तय्यबा मानणारे आहोत, तरीसुद्धा आमची प्रगती होत नाही? प्रथम अंत:करणपूर्वक ईमान तर आणा आणि कलमा-ए-तय्यबानुसार जीवन जगण्यास प्रारंभ तर करा, मग तो वृक्ष बहरेल ज्याच्या मुळ्या खोलवर दृढ होतील आणि आकाशापर्यंत आच्छआदित होतील; तेव्हा पाहाल की, अल्लाहचे वचन खरे आहे आणि तुम्ही समाधानी बनला आहात.

कलमा-ए-ख़बीसला मानणारे प्रगतीपथावर आहेत काय?

याशिवाय आपले असे म्हणणे सुद्धा चुकीचे आहे की कलमा-ए-ख़बीसला मानणारे खरोखर प्रगतीपथावर आहेत. कलमा-ए-ख़बीसला मानणाऱ्यांनी कधीही प्रगती केली नाही आणि आजसुद्धा करीत नाहीत. तुम्ही संपत्तीची विपुलता, ऐश-आरामाची साधने आणि बाह्य डामडौल पाहून असे समजता की ते प्रगती करीत आहेत. परंतु त्यांच्या मनाला विचारा की असे कितीजण आहेत की ज्यांना मानसिक समाधान प्राप्त आहे? त्यांच्यावर चैनीची साधने लादली आहेत परंतु त्यांच्या हृदयात अग्नीच्या भट्ट्या पेटत आहेत ज्या त्यांना शांती लाभू देत नाहीत. अल्लाहच्या कायद्याच्या उल्लंघनाने त्यांच्या घरांना नरक बनवून सोडले आहेत. वर्तमानपत्रात पाहा की यूरोप व अमेरिकेत आत्महत्येचे प्रमाण किती वाढले आहे? घटस्फोटांचे कसे बाहुल्य आहे? वंश कसे घटत आहेत आणि घटविले जात आहेत? कशा प्रकारे असाध्य गलिच्छ रोगाने लक्षावधी मानवी जीवन नष्ट केले आहेत? विविध वर्गांदरम्यान भाकरीसाठी कसा कठोर संघर्ष सुरू आहे? हेवेदावे, कपट व शत्रुत्वाने कशा प्रकारे एकाच जातीच्या लोकांना आपापसात लढण्यास प्रवृत्त केले आहे? ही मोठमोठाली वैभवशाली शहरे की ज्यांना मनुष्य लांबून पाहून स्वर्गासारखे समजतो त्यात लक्षावधी लोक कशा प्रकारे संकटग्रस्त जीवन जगत आहेत? काय यालाच प्रगती व विकास म्हणतात? काय ते हेच स्वर्ग आहे की ज्याचा हेवा वाटल्याने तुमची दृष्टी त्यावर खिळून आहे?

माझ्या बंधुनो! लक्षात ठेवा, अल्लाहचे वचन कदापि खोटे ठरू शकत नाही. वास्तविकत: कलमा-ए-तय्यबाला सोडून अन्य कोणताही कलमा असा नाही की ज्याचे अनुसरण करून मनुष्य या जगात सौख्य व पारलौकिक जीवनात साफल्य प्राप्त करू शकेल. तम्ही हवे तिकडे दृष्टी टाकून पाहा, याच्याविरूद्ध तुम्हाला कोठेही, कसलीही गोष्ट आढळू शकणार नाही.

कलमा-ए-तय्यबावर
ईमान धारण करण्याचा उद्देश

माझ्या बंधुनो! यापूर्वीच्या दोन प्रवचनांत मी आपल्या समोर कलमा-ए-तय्यबाचा अर्थ विषद केला आहे. आज मी या प्रश्नावर चर्चा करीन की कलमा`--तय्यबावर ईमान धारण केल्याने कोणते लाभ पदरी पडतात आणि त्याची काय गरज आहे?

प्रत्येक कार्याचा एक उद्देश आहे

याची तर आपणास कल्पना आहे की मनुष्य जे काही कार्य करतो ते कोणत्या न कोणत्या उद्देशाने करतो, कोणत्या न कोणत्या लाभासाठी करतो. विनाकारण, निरुद्देश, विनालाभ तो कोणतेही कृत्य करीत नाही. आपण पाणी का पितो? तहान शमविण्यासाठी. पाणी प्याल्यानंतर सुद्धा तुमची तीच स्थिती राहिली जशी पाणी पिण्यापूर्वी होती, तर तुम्ही कदापि पाणी पिणार नाही, कारण हे निष्फळ कृत्य ठरेल. तुम्ही अन्न का खाता? भूक मिटविण्यासाठी आणि आपल्या ठायी जीवनशक्ती उत्पन्न व्हावी म्हणून. जेवण्याचा व न जेवण्याचा परिणाम एकच असेल तर तुम्ही म्हणाल की जेवणे व्यर्थ आहे. आजारी पडल्यास तुम्ही औषध का घेता? ते अशासाठी की आजार नाहीसा व्हावा व आरोग्यसंपन्न बनावे.

औषध प्याल्यानंतर सुद्धा तुमच्या त्या स्थितीत कोणतेही अंतर पडले नाही जी आजारपणापूर्वी होती, तर तुम्ही म्हणाल की असले औषध घेणे निरर्थक होय. तुम्ही शेतीसाठी इतके कष्ट का उपसता? ते अशासाठी की जमिनीत धान्य, फळे व भाजीपाला उत्पन्न व्हावा. बियाणे पेरल्यानंतर सुद्धा जमिनीतून काहीही उगवले नसते तर आपण नांगरणे, बी पेरणे व जमिनीला पाणी देण्याचे कष्ट कधीही घेतले नसते. थोडक्यात असे की आपण जगात जे कोणते कार्य करता त्याच्या पाठीमागे कोणता न कोणता उद्देश असतोच. उद्देशपूर्ती झाली तर म्हणता की काम चांगले झाले आणि जर उद्देश पूर्ण झाला नाही तर म्हणता की काम चांगले झाले नाही.

'पवित्र वचन' उच्चारण्याचा हेतु

हे (पवित्र वचन उच्चारण) लक्षात ठेवा आणि माझ्या एका-एका प्रश्नाची उत्तरे द्या. सर्वप्रथम प्रश्न असा आहे की कलमा पठण का केला जातो? याचे उत्तर एकच आहे की कलमा पठण करण्याचा (पवित्र वचन उच्चारण) उद्देश अनेकेश्वरवादी व मुस्लिमात फरक करता यावा. आता विचारतो की फरक करण्याचा अर्थ काय आहे? काय याचा अर्थ असा आहे की अनेकेश्वरवाद्याचे दोन डोळे असतात आणि मुस्लिमाचे चार? अथवा अनेकेश्वरवाद्याला एक डोके असते आणि मुस्लिमाला दोन? आपण म्हणाल की याचा अर्थ असा नव्हे. तर याचा अर्थ असा होय की अनेकेश्वरवाद्याचा शेवट व मुस्लिमाच्या अखेरच्या परिणामात फरक असणे होय. अनेकेश्वरवाद्याचा शेवट असा आहे की तो पारलौकिक जीवनात अल्लाहच्या कृपाप्रसादापासून वंचित राहील व तो अयशस्वी व निराश राहील आणि मुस्लिमाला शेवटी अल्लाहची प्रसन्नता प्राप्त होईल आणि पारलौकिक जीवनात तो यशस्वी व त्याची इच्छापूर्ती झालेली असेल.

पारलौकिक जीवनातील यश व अपयश

मी सांगतो की हे उत्तर आपण अगदी बरोबर दिले आहे, परंतु मला सांगा की पारलौकिक जीवन म्हणजे काय? पारलौकिक जीवनातील अपयश व निष्फळता म्हणजे काय? आणि तेथे यशस्वी व सफल होणे म्हणजे काय? जोपर्यंत मला हे कळत नाही तोपर्यंत मी पुढे जाऊ शकत नाही.

याचे उत्तर देण्याची आपणास गरज नाही. याचे उत्तर अगोदरच दिले गेले आहे,

"जग (इहलोक) परलोकाची शेती आहे."

अर्थात- हे जग व पारलौकिक जीवन दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत तर एकच शृंखला आहे जिचा प्रारंभ जग आहे आणि शेवट पारलौकिक जीवन. या दोहोंमध्ये तोच संबंध आहे जो शेती व पिकात असतो. तुम्ही जमीन नांगरता व बियाणे पेरता. नंतर पाणी देऊन शेतीची राखण करून काळजी घेता. या क्रिया पीक येईपर्यंत चालतात. नंतर पिकाची कापणी करून वर्षभर मजेत खाता. आपण जमिनीत ज्याची शेती कराल त्याचेच पीक येईल. गहू पेराल तर गव्हाचे पीक येईल. काटे लावाल तर काटेच उत्पन्न होतील.

कशाचीच पेरणी केली नाही तर काहीही उत्पन्न होणार नाही. नांगरणे, बी पेरणे, पाणी देणे व शेतीची राखण करण्यात ज्या ज्या चुका व उणिवा आपल्याकडून होतील त्यांचे दुष्परिणाम तुम्हाला पिकाच्या कापणीच्या वेळी लक्षात येतील. तुम्ही ही सर्व कामे चांगल्या प्रकारे केली असतील तर त्यांचा लाभ पीक कापताना तुम्हाला दिसून येईल. अगदी बरोबर हीच स्थिती या जगाची व पारलौकिक जीवनाची आहे. जग ही एक शेती आहे. माणसाला या शेतीत अशासाठी पाठविले आहे की त्याने आपल्या परिश्रम व प्रयत्नाने आपल्यासाठी चांगले पीक काढावे. जन्मापासून मृत्युपर्यंत माणसाला या कामासाठी सवड दिलेली आहे. या काळात माणसाने ज्या प्रकारचे पीक काढले असेल तसलेच पीक मृत्युनंतर दुसऱ्या जीवनात तो कापील. जे पीक तो काढील त्यावरच पारलौकिक जीवनात तो जीवननिर्वाह करील. एखाद्याने आयुष्यभर जगातील शेतीत चांगल्या फळाचे बी लावले असतील, त्यांना भरपूर पाणी दिले असेल व त्यांची चांगली राखण केली असेल तर पारलौकिक जीवनात जेव्हा तो पाऊल ठेवील तेव्हा त्याच्या परिश्रमाची कमाई म्हणून एक हिरवीगार बाग त्याला तयार मिळेल आणि त्याला या दुसऱ्या जीवनात पुन्हा कोणतेही परिश्रम करावे लागणार नाही. या जगात आयुष्यभर कष्ट करून जी बाग त्याने लावली होती त्याच बागेची फळे तिथे आयुष्यभर पुरेशी ठरतील. याचेच नाव जन्नत (स्वर्ग) आहे आणि पारलौकिक जीवनात सफल होण्याचा हाच अर्थ होय. याउलट जो मनुष्य या जगातील आपल्या जीवनात काटे व विषारी कडू फळे लावतो त्याला पारलौकिक जीवनात याच फळांचे उत्पन्न तयार मिळेल. तेथे मग त्याला पुन्हा इतकी संधी मिळणार नाही की आपल्या या मूर्खपणाची चूक दुरुस्त करता यावी आणि हे वाईट पीक जाऊन दुसरे चांगले पीक उत्पन्न करू शकेल. त्याला संपूर्ण पारलौकिक जीवन याच पिकावर जगावे लागले जे त्याने जगात तयार केले आहे. जे काटे त्याने लावले होते त्यांच्याच अंथरुणावर त्याला झोपावे लागेल आणि जी कडू विषारी फळे त्याने लावली होती ती चाखावी लागतील. हाच अर्थ पारलौकिक जीवनात असफल व निराश होण्याचा आहे.

पारलौकिक जीवनाचे हे जे स्पष्टीकरण सांगितले आहे ते पवित्र कुरआन व हदीसप्रमाणे आहे. यावरून हे लक्षात आले की पारलौकिक जीवनात माणसाचे अयशस्वी अथवा यशस्वी होणे आणि त्याचा शेवट चांगला अथवा

वाईट होणे मुळात या जगातील जीवनात माणसाचे ज्ञान व कर्म बरोबर अथवा चूक असण्याचा परिणाम आहे.

अनेकेश्वरवादी व मुस्लिमाच्या परिणतीत फरक का आहे?

जेव्हा ही गोष्ट आपण समजून घेतली तेव्हा हे देखील त्याच्याबरोबर लक्षात येते की मुस्लिम व अनेकेश्वरवाद्याच्या परिणतीत विनाकारण फरक पडत नाही. मुळात परिणतीतील फरक प्रारंभापासून पडलेल्या फरकाचा परिणाम आहे. जोपर्यंत मुस्लिम (आज्ञाकारी) व अवज्ञाकारींच्या (अनेकेश्वरवाद्याच्या) या जगातील ज्ञान व कर्मात फरक असत नाही तोपर्यंत पारलौकिक जीवनातसुद्धा या दोहोंच्या परिणतीत फरक पडू शकत नाही. एखाद्या माणसाचे ज्ञान व कर्म तेच असावे जे अवज्ञाकारीचे आहे तर हे कदापि शक्य नाही की तो मनुष्य त्या शेवटापासून वाचावा जसा अवज्ञाकारीचा शेवट होतो.

कलम्याचा उद्देश - ज्ञान व आचरणात सुधारणा

आता पुन्हा तोच प्रश्न उत्पन्न होतो की कलमा उच्चारण्याचा उद्देश काय आहे? पूर्वी आपण याचे उत्तर असे दिले होते की कलमा उच्चारण्याचा उद्देश असा आहे की अनेकेश्वरवादी व मुस्लिमात शेवटी अंतर पडावे. आता शेवट किंवा परिणती व पारलौकिक जीवनाचे जे स्पष्टीकरण तुम्ही ऐकले आहे, त्यानंतर तुम्हाला तुमच्या उत्तरावर पुनर्विचार करावा लागेल. आता आपणास असे म्हणावे लागेल की कलमा उच्चारण्याचा उद्देश जगात माणसाच्या ज्ञान व कर्मात सुधारणा करणे होय जेणेकरून पारलौकिक जीवनात त्याचा शेवट योग्य व्हावा. हा कलमा माणसाला जगात ती बाग लावणे शिकवितो जिची फळे पारलौकिक जीवनात त्याला तोडावयाची आहेत. मनुष्य हा कलमा मानत नसेल तर त्याला बाग लावण्याची पद्धतीच कळू शकत नाही. मग तो कशा प्रकारे बाग लावील आणि पारलौकिक जीवनात कशाची फळे तोडील? माणसाने जिभेने या कलम्याचे पठन केले, परंतु त्याचे ज्ञान अशिक्षिताप्रमाणेच असेल, त्याचे कर्मसुद्धा तसेच असेल जसे अनेकेश्वरवाद्याचे असते; तर तुमची बुद्धी स्वतःच म्हणेल की असा कलमा (वचन) पठन केल्याने काहीही प्राप्त होत नाही. मग अशा माणसाचा शेवट अनेकेश्वरवाद्यापेक्षा वेगळा असण्याचे काहीही कारण नाही. जिभेने कलम्याचा उच्चार करून त्याने अल्लाहवर काही उपकार केले नाहीत. त्याने बाग लावण्याची पद्धतही शिकू नये. बागसुद्धा

लावू नये. आयुष्यभर काटेच पेरीत राहावे आणि तरीसुद्धा पारलौकिक जीवनात त्याला फळांची बहरलेली बाग मिळावी हे शक्य नाही. जसे की मी पूर्वी अनेक उदाहरणे देऊन सांगितले आहे की जे कार्य करणे अथवा न करण्याचा परिणाम जर एकच असेल तर ते कार्य व्यर्थ व निरर्थक होय. या जगातच अनेकेश्वरवादी व मुस्लिमाच्या जीवनात फरक घडला नाही तर पारलौकिक जीवनात त्यांच्या परिणतीत कसा फरक असू शकेल?

कलमा-ए-तय्यबा कोणते ज्ञान शिकवितो?

आता असा प्रश्न समोर उभा राहतो की ते कोणते ज्ञान आहे की जे कलमा-ए-तय्यबा मानवास शिकविते? हे ज्ञान प्राप्त केल्यानंतर मुस्लिमाचे (आज्ञधारकाचे) कर्म व अवज्ञाकारीच्या कर्मात काय फरक पडतो?

१. अल्लाहची गुलामी - पाहा की पहिली गोष्ट जी या कलम्याने आम्हाला कळते ती अशी आहे की आम्ही अल्लाहचे दास आहोत आणि अन्य कोणाचेही दास नाही. जेव्हा ही गोष्ट आम्हास कळाली तेव्हा आपोआपच आम्हाला हेसुद्धा कळले की आम्ही ज्याचे दास आहात त्याच्या मर्जीप्रमाणेच आम्हाला या जगात कर्म केले पाहिजे. आम्ही त्याच्या इच्छेविरूद्ध वागलो तर हा आमच्या स्वामीशी विद्रोह ठरेल.

२. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनुसरण - हे कळल्यानंतर तुम्हाला कलम्यामुळे दुसरे ज्ञान प्राप्त होते ते असे की आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत. हे जर आपल्याला कळले तर हे देखील त्याचबरोबर आपोआप माहीत झाले की अल्लाहचे प्रेषित (मुहम्मद स.) यांनी जगाच्या शेतीत काटे व विषारी फळांऐवजी फुलाची व सुमधुर फळांची बाग ज्याप्रकारे लावावयास शिकविली आहे त्याच प्रकारे या जगात तुम्ही बाग लावली पाहिजे. तुम्ही या पद्धतीचा अवलंब कराल तर पारलौकिक जीवनात तुम्हाला चांगले पीक प्राप्त होईल आणि त्याउलट कृत्य कराल तर तुम्ही जगात काटे पेराल व पारलौकिक जीवनात काटेच प्राप्त कराल.

ज्ञानाप्रमाणे कृती असणे आवश्यक आहे

ही ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर अनिवार्य आहे की तुमची कृतीदेखील त्याप्रमाणे असावी. तुम्हाला ही खात्री आहे की एके दिवशी मरावयाचे आहे आणि मृत्यूपश्चात आणखी एक दुसरे जीवन आहे. त्या जीवनात तुम्हाला त्याच पिकावर जीवन व्यतीत करावयाचे आहे जे तुम्ही या जगात पिकविले आहे. अशा स्थितीत मग तुम्ही प्रेषित मुहम्मद (स.) यांनी दाखविलेली पद्धत सोडून अन्य एखादी पद्धत अवलंबिणे अशक्य आहे. या जगात तुम्ही शेतीवाडी का करता? त्याला कारण असे की तुम्हाला खात्री आहे की शेतीवाडी केली नाही तर धान्याचे उत्पादन होणार नाही आणि धान्य उत्पन्न झाले नाही तर उपाशी मरावे लागेल. तुम्हाला ही खात्री नसती आणि अशी खात्री असती की शेती न करता देखील धान्य उत्पन्न होईल अथवा धान्याविनादेखील तुम्ही भुकेपासून वाचू शकाल तर आपण शेतीवाडीत हे परिश्रम कदापि तुम्ही केले नसते. बस्स यावरूनच आपल्या स्थितीची कल्पना करा. जो मनुष्य असे म्हणतो की मी अल्लाहला माझा स्वामी व आदरणीय मुहम्मद (स.) यांना अल्लाहचा प्रेषित मानतो व पारलौकिक जीवनसुद्धा मानतो, परंतु पवित्र कुरआनची शिकवण व प्रेषित (मुहम्मद स.) यांच्या सुन्नत (प्रेषिताचरण) विरूद्ध त्याची कृत्ये असतील, तर त्याच्यासंबंधी असे समजावे की खरोखर त्याचा ईमान (विश्वास, श्रद्धा) निर्बळ आहे. त्याला असा विश्वास त्याच्या जमिनीत शेती न केल्याने होणाऱ्या दुष्परिणामाचा आहे तसाच विश्वास पारलौकिक जीवनासाठी या जगात पीक तयार न केल्याने होणाऱ्या वाईट परिणतीचासुद्धा असेल तर तो कदापि या कामात गाफील राहणार नाही. कोणीही मुद्दाम आपल्यासाठीकाटे पेरीत नाही. काटे तर तोच पेरतो ज्याला असा विश्वास नसतो की जी वस्तु तो पेरीत आहे त्यापासून काटे उत्पन्न होतील आणि ते काटे त्याला त्रास देतील. तुम्ही समजून उमजून अग्नीचा निखारा हातात उचलीत नाही, कारण तुमचा विश्वास आहे की यामुळे हात पोळेल. परंतु एखादे लहान मूल आगीत हात घालते कारण त्याला माहीत नसते की याचा परिणती काय होईल.